रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २१९
www.ramprahar.com
◆ बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

रायगडात फिरती लोकअदालत आणि कायदेशीर शिबिर/२
नवी मुंबई पालिका हद्दीत कर थकबाकीदारांच्या संख्येत वाढ/६
रायगडच्या संघाने मैत्री चषक जिंकला/८

## झारखंडमध्ये एअर ॲम्ब्युलन्स कोसळून सात जणांचा मृत्यू



**रांची :** झारखंडची राजधानी रांची येथून दिल्लीच्या दिशेने निघालेल्या एका खासगी चार्टर एअर ॲम्ब्युलन्सला भीषण अपघाताचा सामना करावा लागला आहे. बिरसा मुंडा विमानतळावरून झेपावलेले रेडबर्ड एअरवेज प्रा.लि.चे बीचक्राफ्ट सी ९० हे विमान झारखंडमधील चतरा जिल्ह्यातील कसरिया पंचायत परिसरात कोसळले. या काळजाचा थरकाप उडवणाऱ्या अपघातात चालक दलातील दोन सदस्यांसह विमानात असलेल्या एकूण सातही जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. एका गंभीर रुग्णाला उपचारासाठी तातडीने दिल्लीला नेले जात असतानाच वाटेत हा भीषण अपघात घडला. या घटनेची माहिती मिळताच नागरी विमान वाहतूक संचालनालयाने निवेदन जारी करून घटनेची पुष्टी केली. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी विमानाचे अवशेष आणि तांत्रिक बाबी तपासल्या जात आहेत.

### महाराष्ट्र प्रदेश भाजप कार्यकारिणीची घोषणा

# आमदार प्रशांत ठाकूर यांना चिटणीसपदाची मोठी जबाबदारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पक्षाच्या प्रदेश कार्यकारिणीची घोषणा केली आहे. या कार्यकारिणीत अनेक नव्या चेहऱ्यांना राज्य पातळीवर काम करण्याची संधी देण्यात आली असून यात पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांना चिटणीसपदाची मोठी जबाबदारी देण्यात आली.

याशिवाय आमदार निरंजन डावखरे, आमदार गोपीचंद पडळकर, कृष्णराज महाडिक यांच्यावर पक्षाने नवी जबाबदारी टाकली आहे. केशव उपाध्ये यांनाही कार्यकारिणीत बढती दिली गेली असून यापुढे मुख्य प्रवक्तेपदाची जबाबदारी नवनाथ बन यांच्यावर टाकण्यात आली आहे.



प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पत्रकार परिषद घेत प्रदेश कार्यकारणीतील नावांची घोषणा केली. यावेळी ते म्हणाले की, काही महिन्यांपूर्वीच केंद्रीय नेतृत्वाने माझ्याकडे भाजपचे प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी दिली. त्यानंतरच्या काळात निवडणूक आचारसंहिता आणि एकापाठोपाठ एक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू होत्या. त्यामुळे प्रदेश कार्यकारिणी, पदाधिकारी नेमणुका या निवडणुकीनंतर कराव्यात असा निर्णय भाजपच्या राज्यातील प्रमुख पदाधिकारी आणि नेत्यांनी घेतला होता. काही महिने पदाधिकारी नेमणुकांबाबत राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यापासून राज्यातील प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस आणि इतर मंडळींसोबत चर्चा केली, असे त्यांनी सांगितले.

या नियुक्तीबद्दल आमदार प्रशांत ठाकूर व निरंजन डावखरे यांनी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची सदिच्छा भेट घेऊन आभार व्यक्त केले, तर प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासमवेत खासदार धैर्यशील पाटील, आमदार महेश बालदी आदी उपस्थित होते.

या कार्यकारिणीत उपाध्यक्ष म्हणून अतुल काळसेकर, भारती पवार, संजय कौडगे, संजय भेंडे, रामदास तडस, केशव उपाध्ये, प्रवीण पोटे, गोपीचंद पडळकर, चैतन्यबापू देशमुख, प्रिया शिंदे, सुजय विखे, अर्चना पाटील चाकूरकर; सरचिटणीसपदी निरंजन डावखरे, योगेश सागर, संजय कुटे, माधवी नाईक, राजेश पांडे, सुनील राणे; चिटणीसपदी प्रशांत ठाकूर, मंगेश चव्हाण, परिणय फुके, वर्षा ढहाळे, संतोष जनाटे, संजय जगताप, अर्चना डेहनकर, रोहिणी नायडू, राम सातपुते, प्रवीण घुगे, रेखा कुलकर्णी, भैरवी वाघ, कोषाध्यक्षपदी मिहीर कोटेचा, सहकोषाध्यक्ष अरुण लखानी, मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, मुख्यालय सहप्रभारी विश्वास पाठक, मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांची नियुकी करण्यात आली आहे.

युवा मोर्चा अध्यक्षपदी कृष्णराज महाडिक, महिला मोर्चा अध्यक्ष चित्रा वाघ, किसान मोर्चा अध्यक्ष रामकृष्ण वेताळ, ओबीसी मोर्चा अध्यक्ष योगेश टिळेकर, एससी मोर्चा अध्यक्ष विश्वजित गायकवाड, एसटी मोर्चा अध्यक्ष देवराव होळी, भटके विमुक्त मोर्चा अध्यक्ष नरेंद्र पवार, तर अल्पसंख्यक मोर्चा अध्यक्षपदी इद्रिस मुलतानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान, भाजपच्या कार्यपद्धतीत तीन वर्षात पदाच्या जबाबदाऱ्या बदलत असतात. प्रत्येक पदाधिकारी, कार्यकर्ता पूर्ण क्षमतेने काम करत असतो. कार्यपद्धतीप्रमाणे नवीन चेहऱ्यांसोबत अनुभवी चेहऱ्यांना संधी दिली आहे, असे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी म्हटले.

### पक्ष संघटनेत प्रभावी योगदान

चारवेळा आमदार म्हणून निवडून आलेले प्रशांत ठाकूर यांनी रायगड जिल्ह्यात पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील महत्त्वाची मानली जाणाऱ्या पनवेल महापालिकेत सलग दोन वेळा सत्ता मिळवून देण्यात त्यांना यश आले तसेच नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्येही त्यांनी पक्षाचे वर्चस्व सिद्ध केले.

पनवेल महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये यापूर्वी कधीही सत्ता न मिळालेल्या भारतीय जनता पक्षाला आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कुशल आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे सत्ता प्राप्त झाली. याचबरोबर तळागाळापर्यंत भाजपची संघटना बळकट करत विकासाची दिशा सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याचे कामही त्यांनी प्रभावीपणे केले आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी गावपातळीपासून शहरापर्यंत कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करून विकासाच्या योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम प्रभावीपणे केले आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे लक्ष देत पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगारनिर्मिती यांसारख्या क्षेत्रांत विकासाची गती वाढवण्यास त्यांनी प्राधान्य दिले. रायगड जिल्ह्यातील राजकीय समीकरणांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणत पक्षाची भक्कम पायाभरणी करण्याचे कार्यही त्यांनी केले आहे.

## 'शासकीय कामकाजात एआयचा प्रभावी वापर'

**मुंबई : प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बाजारपेठेचे आणि रोजगाराचे स्वरूप झपाट्याने बदलत असून शासनाने सज्ञ आणि सक्षम प्रशासन उभारण्यासाठी शासकीय कामकाजात एआयच्या प्रभावी वापरावर भर देण्यास सुरुवात केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुंबई येथे नॅसकॉम टेक्नॉलॉजी ॲण्ड लिडरशिप फोरमच्या चर्चासत्रात पत्रकार विष्णू सोम यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरात मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपले विचार व्यक्त केले. या चर्चासत्रात मायक्रोसॉफ्ट इंडियाच्या अध्यक्ष सिंधू गंगाधरन आणि पीडब्ल्यूसीचे अध्यक्ष संजीव कृष्णन यांचाही सहभाग होता.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शासन यंत्रणेत एआयचा वापर वाढवून सक्षम डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला जात आहे. राज्यातील शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्र यामध्ये समन्वय वाढवून एआय-सक्षम मनुष्यबळ तयार करण्यावर शासन काम करत आहे. यासाठी मुंबईत राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. बदलत्या तंत्रज्ञानामुळे रोजगाराच्या संधींचे स्वरूप बदलत आहे आणि शिक्षण प्रणालीने त्यानुसार करावयाचे बदल यावर विचारमंथन होईल. शासन, शिक्षण संस्था आणि नॅसकॉमसारख्या उद्योग संघटनांनी एकत्रितपणे काम केल्यास एआय क्षेत्रात महाराष्ट्र अधिक वेगाने पुढे



जाऊ शकतो.

अलीकडेच दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत ब्राझीलच्या मंत्र्यांनी भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या अनुभवाच्या आधारे स्वतःची प्रणाली विकसित करत असल्याचे सांगितले. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या बाबतीत भारत सध्या जागतिक नेतृत्व करत आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्यात नुकत्याच सुरू झालेल्या एआय ४ग्री समिटचा उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले की, ग्रीस्टॅक या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याची जमीनधारणा, पिकांची माहिती आणि इतर तपशील एकत्रित केले जात आहेत. त्याचबरोबर महाविस्तार या एआय ॲपद्वारे जनरेटिव्ह एआयचा वापर करून प्रत्येक नोंदणीकृत शेतकऱ्याला वैयक्तिक डिजिटल सहाय्यक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सध्या ३० लाख शेतकरी या प्लॅटफॉर्मवर जोडले गेले आहेत. ॲग्रीस्टॅक आणि महाविस्तार यांचा संगम शेतकऱ्यांसाठी उत्पादन खर्च २५ ते ४० टक्क्यांनी कमी करण्यास आणि शेतीतील अनिश्चितता कमी करण्यास नक्की मदत करेल.

## निवडक

### राष्ट्रपतींच्या हस्ते मुंबईत राष्ट्रीय अभियानाचे उद्घाटन

**मुंबई :** महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आणि राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पी.डी. हिंदुजा हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर, मुंबई आयोजित सेव्हिंग लाइव्हज बिल्डिंग अ हेल्दियर भारत या राष्ट्रीय अभियानाचे मंगळवारी (दि. २४) उदघाटन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, हिंदुजा समूहाचे अध्यक्ष अशोक हिंदुजा आदी मान्यवर उपस्थित होते.

### केरळचे नाव आता केरळम; केंद्राकडून प्रस्ताव मंजूर

**नवी दिल्ली :** केरळ राज्याचे नाव बदलून आता केरळम होणार आहे. काही दिवसांपूर्वी तेथील राज्य सरकारकडून तसा प्रस्ताव आला होता. या प्रस्तावावर विचार करून केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मंगळवारी (दि. २४) झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

# उमेदवार प्रत्यक्ष उपस्थित नसताना आरटीओ एजंटमार्फत लर्निंग लायसन्स मिळवण्याचा प्रकार उघड

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी वेधले शासनाचे लक्ष

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

एआयच्या मदतीने उमेदवार प्रत्यक्ष उपस्थित नसताना आरटीओ एजंटमार्फत शिकाऊ अनुज्ञप्ती (लर्निंग लायसन्स) मिळवण्याचे गैरप्रकार होत आहेत. हा गंभीर मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे दाखल केला.

राज्य शासनाचे लक्ष वेधताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले की, काही ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा गैरवापर करून उमेदवाराची ओळख बनावटरीत्या सादर केली जात आहे. संबंधित उमेदवार परीक्षा देण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित नसतानाही आरटीओ एजंटांच्या




माध्यमातून ऑनलाईन चाचणी पूर्ण करून लर्निंग लायसन्स मिळवले जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. या प्रकारामुळे परवाना वितरण प्रक्रियेची पारदर्शकता आणि विश्वासार्हता धोक्यात येत असून रस्ते सुरक्षेवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. यावर शासनाकडून संबंधित विभागामार्फत तपास करून आवश्यक ती कारवाई करण्याची गरज असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या प्रश्नातून अधोरेखित केले.

राज्यात एआयच्या मदतीने उमेदवाराशिवाय लर्निंग लायसन्सची काही सेकंदात चाचणी द्यायची आणि उत्तीर्ण होऊन लायसन्स आरटीओ एजंटच्या मदतीने मिळवण्याचे तसेच ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, ई-चलन इत्यादी सेवांशी संबंधित बनावट वेबसाईट, फसवे मोबाईल ॲप्सव्दारे पाठविल्या जाणाऱ्या खोट्या लिंकव्दारे नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याचे जानेवारी २०२६मध्ये निदर्शनास आले आहे. सन २०२२ ते २०२५ या कालावधीत वाहन शिकण्यासाठीचे सुमारे ३२ लाख लर्निंग लायसन्स जारी केले गेले असून त्यापैकी किती उमेदवारांनी लर्निंग लायसन्स चुकीच्या पद्धतीचा वापर करून मिळविले याचा शोध आता परिवहन विभाग घेणार आहे का? त्याचप्रमाणे खोट्या लिंकव्दारे वाहन चालक, मालक यांची आर्थिक फसवणूक, वैयक्तिक माहितीची चोरी तसेच नागरिकांच्या ओळखीचा गैरवापर होत असल्याचे निदर्शनास आले असून या प्रकरणी शासनाने चौकशी करून बनावट परवाने घेणाऱ्यांवर व देणाऱ्यांवर कारवाई करण्यासह लर्निंग लायसन्स रद्द करण्याकरिता तसेच बनावट वेबसाईट, मोबाईल ॲप्सला आणि भविष्यात अशा प्रकारच्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी सायबर सुरक्षा प्रणालीत आणि अधिकृत संकेतस्थळाच्या सुरक्षिततेत सुधारणा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दाखल केला होता. **(पान २ वर..)**

## मुंबई मनपाचा अर्थसंकल्प आज होणार सादर

**मुंबई :** येथील महापालिकेची निवडणूक अलिकडेच पार पडली आणि या निवडणुकीत भाजपप्रणित महायुतीने विजय मिळवला. यानंतर महापौरपदी भाजपच्या रितू तावडे आणि उपमहापौरपदी शिवसेनेच्या संजय घाडी यांची निवड झाली आहे. त्यामुळे मुंबई पालिकेतील प्रशासकराज संपले आहे. त्यानंतर आता आशिया खंडातील सर्वात श्रीमंत असणाऱ्या मुंबई महापालिकेचा २०२६-२७चा अर्थसंकल्प बुधवारी (दि. २५) सादर होणार आहे.

माहितीनुसार सकाळी ११ वाजता महापालिका अतिरिक्त आयुक्त डॉ. अविनाश ढाकणे हे शिक्षण समितीचा अर्थसंकल्प शिक्षण समितीच्या अध्यक्षा राजश्री शिरवाडकर यांच्याकडे सादर करतील. त्यानंतर दुपारी २ वाजता महापालिका आयुक्त डॉ. भूषण गगराणी मुंबई महापालिकेसाठीचा वार्षिक अर्थसंकल्प स्थायी समितीचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांच्याकडे स्थायी समितीच्या सभागृहात सादर करणार आहेत. मग दुपारी साडेतीन वाजता आयुक्त गगराणी यांची पत्रकार परिषद होणार आहे.





पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि सौ. शकुंतला ठाकूर यांच्या लग्नाचा ५३वा वाढदिवस मंगळवारी होता. यानिमित्ताने विविध मान्यवरांनी या दाम्पत्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. नातू अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर यांनीही आपल्या आजी-आजोबांच्या लग्नाचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा केला.



# नेरळ येथील गुरांच्या दवाखान्याला टाळे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ येथे असलेला पशुवैद्यकीय दवाखाना गेली अनेक महिने बंद आहे. या दवाखान्याला टाळे लावण्यात आले आहे. रुग्णालयात डॉक्टर उपलब्ध नसल्याने नेरळ परिसरातील वीस गावे आणि वाड्या मधील पशुपालक यांचे हाल सुरू असून खासगी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडे उपचारासाठी आपल्या पशूंना न्यावे लागत आहे.



नेरळ गावातील खांडा भागात पशुवैद्यकीय दवाखाना असून किमान वीस वर्षे तेथे पशुपालक यांना सेवा देण्याचे काम केले जात होते. मात्र गेल्या काही वर्षात नेरळ येथील पशुवैद्यकीय दवाखाना यास कायमस्वरूपी पशुवैद्यकीय अधिकारी मिळालेला नाही. कर्जत तालुक्यात पशुवैदयकीय अधिकारी यांची अनेक पदे रिक्त असल्याने नेरळ मध्ये देखील गेली चार वर्षे कायमस्वरूपी पशुवैद्यकीय अधिकारी नाही. त्यामुळे आजुबाजूच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन अधिकाऱ्यांकडे एकाहून अधिक पशुवैद्यकीय दवाखाना यांच्यावर जबाबदारी दिली आहे. नेरळ येथे वाकस येथील पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडे अतिरिक्त जबाबदारी आहे. पुढे चिंचवली येथील पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडे माथेरान पशुवैद्यकीय दवाखान्याचा कारभार आहे. मात्र असे असताना नेरळ परिसराचे पशुपालक यांच्यासाठी आरोग्य केंद्र असलेल्या नेरळ

## पशुपालक संकटात

पशुवैद्यकीय दवाखान्याला कोणीही वाली राहिलेला नाही. त्यामुळे तेथे चक्क टाळे लावण्यात आले असून पशुपालकांसाठी ही धोक्याची घंटा आहे.

नेरळ परिसरातील नेरळ वगळता अन्य प्रत्येक गावात मोठ्या प्रमाणावर पशुधन स्थानिक शेतकऱ्यांकडे उपलब्ध आहे. नेरळ येथील पशुवैद्यकीय दवाखाना याला टाळे लावण्यात आल्याने पशुपालक संतप्त झाले आहेत. या पशुवैद्यकीय दवाखाना परिसरात असलेले पशुपालक यांच्या असलेले पशू यांच्यावर उपचार करण्याची वेळ आली तर खासगी पशुधन अधिकारी यांच्याकडे जावे लागत आहे. नेरळ मध्ये असलेल्या दवाखान्याला टाळे लावण्यात आले असून येथे तेथील पर्यवेक्षक यांचा नंबर लावण्यात आला आहे. सदर पर्यवेक्षक कर्मचारी हा शेतकऱ्यांचे फोन देखील घेत नाही आणि कोणत्याही प्रकारची माहिती देत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या पशुवर कोणत्या प्रकारचे उपचार करायचे? हे स्थानिक शेतकऱ्यांना कळत नाही. त्यामुळे नेरळ भागातील पशुपालक यांच्यावर संकट आले आहे. लॅम्पी सारखा आजार शेतकऱ्यांना पशूंना भेडसावत आहे आणि त्यामुळे सरकारने या ठिकाणाच्या कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. अशी मागणी केली आहे. भडवळ गावातील तरुण कार्यकर्ते महेश जामघरे यांनी पशुवैद्यकीय अधिकारी यांची महिनो न महिने अनुपस्थिती आणि पशुधन दवाखान्याला लावण्यात आलेले टाळे या प्रकरणी चौकशी करावी. अशी मागणी जामघरे यांनी केली आहे.

# महाड बसस्थानक परिसरातील बेकायदा वाहतूक रोखा; रिक्षा संघटनेची मागणी

## तीन आसनी रिक्षांच्या दरफलकासाठी प्रवासी आग्रही

**महाड : प्रतिनिधी**

महाड बसस्थानक परिसरातून भाडे वाहतूक करणाऱ्या खाजगी वाहनांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी महाड तालुका रिक्षा युनियन, रिक्षा चालक मालक संघ, स्वराज्य रिक्षा संघटना आदी संघटनांनी निवेदनाद्वारे महाड शहर पोलीस ठाण्याकडे केली आहे. याचवेळी महाड शहरातील रिक्षा वाहतूक करणाऱ्या रिक्षा स्टँडवर अथवा रिक्षाचालकांच्या गाडीत दर पत्रक असावे अशी मागणीदेखील प्रवाशांकडून होत आहे



१९ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त गडाकडे जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी असताना काही प्रवाशांची शेवटची गाडी चुकली. त्यावेळी एका खासगी इर्टिका वाहनचालकाने त्यांना गडावर नेण्याचा प्रयत्न केला. रिक्षा स्टॉपवरील रिक्षा चालकांनी त्या वाहतूक करणाऱ्या खाजगी वाहनचालकाला रोखण्याचा प्रयत्न केला. दरम्यान यावेळी रिक्षा चालक व खाजगी वाहन चालक यांच्यामध्ये बाचाबाची होऊन हाणामारी झाली.

याप्रकरणी संतप्त महाड रिक्षाचालक व महाड तालुका रिक्षा युनियन,रिक्षा चालक मालक संघ, स्वराज्य रिक्षा संघटनांच्या वतीने महाड शहर पोलीसांना निवेदन देउन बसस्थानक परिसरात या खाजगी व बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांविरोधात कारवाई करण्याची मागणी केली आहे.महाड मधील तीन आसनी रिक्षात प्रवास करणाऱ्या प्रवासी व रिक्षा चालकांमध्ये भाड्यावरून सतत वाद होत असतात. महाड शहरात प्रवास करताना कमीत कमी भाडे दर निश्चित नसून रिक्षा चालक कधीकधी मनमानी पद्धतीने रिक्षा भाडे वसूल करतात. त्यांच्यावरही कारवाई करण्याची मागणी प्रवाशांनी केली आहे

## रायगडात फिरती लोकअदालत आणि कायदेशीर शिबिराचे आयोजन

**अलिबाग : रामप्रहर**

मा.उच्च न्यायालय विधी सेवा समिती मुंबई यांच्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग राजेंद्र द. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली न्याय आपले दारी या संज्ञेअंतर्गत दि.०२ मार्च ते दि.३० मार्च २०२६ या कालावधीत संपूर्ण रायगड जिल्ह्यात फिरते लोक अदालत व कायदेशीर शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या फिरत्या लोकअदालतीचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग राजेंद्र द. सावंत यांनी केले आहे.

या कार्यक्रमास सर्व न्यायिक अधिकारी वर्ग अलिबाग, जिल्हा सरकारी वकील व अध्यक्ष वकील संघटना अलिबाग हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. सदरचे फिरते न्यायालय रायगड जिल्ह्यामध्ये ३० मार्च २०१६ पर्यंत कार्यरत असणार आहे. ते जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये जाऊन लोक अदालत आयोजित करणार आहेत.

## रिक्षा उलटून प्रवासी जखमी

**पनवेल :** वेगाने रिक्षा चालवून रिक्षा अनियंत्रित होऊन पलटी झाल्याने झालेल्या अपघातात २७ वर्षीय सुनील दहिफळे हे प्रवासी जखमी झाले. याप्रकरणी रिक्षा चालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनौल दहिफळे हे सेक्टर-२७, तळोजा फेस टू येथे राहत असून, त्यांनी आरएएफ सिग्नल येवून धानसरला जाणारी शेअरिंग रिक्षा पकडली. या वेळी रिक्षाचालक भरधाव वेगाने रिक्षा चालवत असताना, वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हो रिक्षा रस्त्यावर उलटी होऊन हा अपघात झाला. या अपघातात दहिफळे रस्त्यावर पडले व रिक्षा त्यांच्या पायावर पडून ते जखमी झाले .

## रवींद्र देवधर यांना बलराज साहनी पुरस्कार घोषित

**पुणे : प्रतिनिधी**

बलराज साहनी - साहिर लुधियानवी फाऊंडेशनतर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा बलराज साहनी पुरस्कार या वर्षी ज्येष्ठ रंगकर्मी रवींद्र देवधर यांना घोषित झाला असून ३ मार्च रोजी पुण्यात एका विशेष कार्यक्रमात थोर साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते तो त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.

इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन (इप्टा)चे महाराष्ट्राचे सचिव बरोबरच कलाकृती निवडताना वेगळा समाज प्रबोधनपर मार्ग निवडणारे अभिनेते व दिग्दर्शक म्हणून रविंद्र देवधर हे नाट्य वर्तुळात सुपरिचित आहेत.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अकथित पण महत्त्वपूर्ण पानं उलगडणाऱ्या देवधर यांची संकल्पना व मुख्य भूमिका असलेल्या 'मी भारतीय' या दीर्घांकाचे २४९ प्रयोग त्यांनी केले आहेत. माजी एअर मार्शल भूषण गोखले, ऑस्करपर्यंत मजल मारलेले ज्येष्ठ कलाकार अरुण नलावडे यांसारख्या अनेक नामांकितांनी प्रत्येक भारतीयाने अनुभवायला हवा असा नाट्यानुभव या शब्दांत 'मी भारतीय'ला गौरवलेलं आहे.



मंगळवारी ३ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात एका विशेष कार्यक्रमात पुरस्कार वितरण होणार आहे. त्यानंतर 'मी भारतीय' नाट्य प्रयोग सादर होणार आहे.

याशिवाय या कार्यक्रमात चित्रपट समीक्षक, मुक्त पत्रकार कृपाशंकर शर्मा यांना 'साहिर लुधियानवी पुरस्कार', डॉ. बालाप्रसाद बडायले यांना 'जीवन गौरव पुरस्कार' आणि छायाचित्रकार व आंबेडकरी चळवळीतले कार्यकर्ते दीप्ती लोंढे यांना महान दिग्दर्शक ऋत्विक घटक ह्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'ऋत्विक घटक पुरस्कार' पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येईल.

## खोपोलीत धोकादायक ड्रेनेज टँकमधून गायीची सुखरूप सुटका

**खोपोली , चौक : प्रतिनिधी**

शहरातील मोगलवाडी डीपी रस्त्यालगत असलेल्या एका निर्माणाधीन इमारतीच्या ड्रेनेज टँकचे झाकण तुटल्याने एका गाभण गायीचा टँकमध्ये पडून अपघात झाला. जवळपास दोन तास सुरू असलेल्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर गायीला कोणतीही गंभीर इजा न होता सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले.

टँकमध्ये सुमारे सात ते आठ फूट पाणी साचलेले असल्याने गायीला हालचाल करण्यास पुरेशी जागा नव्हती. घटनेची माहिती मिळताच हेल्प फाउंडेशनचे सदस्य आणि खोपोली नगरपालिका फायर ब्रिगेडची टीम तात्काळ घटनास्थळी दाखल झाली.मालकांकडून ती गाय गाभण असल्याची माहिती मिळाल्याने बचावकार्य अधिक काळजीपूर्वक राबविण्यात आले. प्रथम सक्शन पंपाच्या सहाय्याने टँकमधील काही प्रमाणात पाणी उपसण्यात आले. त्यानंतर जेसीबी यंत्रणा आणि मानवी साखळीच्या मदतीने टँकची भिंत नियंत्रित पद्धतीने फोडण्यात आली.



दोन तास सुरू असलेल्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर गायीला सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. या धाडसी आणि समन्वयपूर्ण बचावकार्यासाठी खोपोली नगरपालिकेचे परिवहन सभापती किशोर पाटील यांनी दोन्ही पथकांचे कौतुक केले. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी निर्माणाधीन ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना काटेकोरपणे राबविण्याची गरज असल्याचे स्थानिक सामाजिक कार्यकर्ते सावंत यांनी सांगितले.

## नडोदे ग्रामपंचायत उपसरपंचपदी महायुतीचे आशिष दळवी

**चौक : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत नडोदे उपसरपंचपदी आशिष संतोष दळवी यांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत नडोदे यांच्या उपसरपंच सौ. सुवर्णा अनिल घोसाळकर यांनी राजीनामा दिल्याने आज उप सरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली, महायुतीचे आशिष संतोष दळवी यांचा एकमेव अर्ज आल्याने पीठासन अधिकारी तथा सरपंच निकिता भालेराव यांनी आशिष दळवी यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.



आमदार महेंद्र थोरवे, आमदार महेश बालदी,भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, माजी उपाध्यक्ष व पंचायत समिती सदस्य भाई शिंदे,सरपंच प्रितेश मोरे, अनिल दळवी, राहुल विचारे, महेश विचारे यांनी त्यांचे अभिनंदन केले. स्वच्छ पाणी,रस्ते, महिला सक्षमीकरण आणि गावचा सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे उप सरपंच आशिष दळवी यांनी सांगितले.

## वणव्याच्या आगीतून अजगराला वाचवण्यात वनविभाग आणि हेल्प फाउंडेशनला यश

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील लव्हेज गावाजवळील डोंगरपट्ट्यामध्ये भीषण वणवा पेटला होता. सर्वत्र धूर, आगीच्या ज्वाळा आणि भीतीचे वातावरण होते. अशा संकटाच्या क्षणी वनकर्मचारी आणि स्थानिक आदिवासी जीवाची पर्वा न करता वणवा आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करत होते.



याच दरम्यान त्यांच्या नजरेस एक हृदयद्रावक दृश्य पडले, तेथे अजगर जातीचा साप धगधगत्या ज्वाळांमधून जीव वाचवण्यासाठी धडपड करत होता. परिस्थितीची गंभीरता ओळखून त्यांनी तात्काळ खोपोली वनविभागाचे अधिकारी भगवान दळवी यांच्या माध्यमातून हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर यांच्याशी संपर्क साधला. क्षणाचाही विलंब न करता गुरुनाथ साठेलकर आणि दिनेश ओसवाल यांनी घटनास्थळी धाव घेत वनपाल भगवान दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे सात ते आठ फूट लांबीच्या अजगराला अत्यंत दक्षतेने सुरक्षित पकडले.

या परिसरात पेटलेल्या वणव्याच्या ज्वाळांमधून मार्ग काढत त्या अजगराला सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. तज्ज्ञांकडून त्याच्यावर आवश्यक उपचार करून त्याला सुरक्षित वनक्षेत्रात सोडण्यात येणार आहे.

**पान १ वरुन**

## उमेदवार प्रत्यक्ष उपस्थित नसताना आरटीओ एजंटमार्फत लर्निंग लायसन्स मिळण्याचा प्रकार उघड

या प्रश्नावर राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी आपल्या लेखी उत्तरात सांगितले की, एआयच्या मदतीने उमेदवाराशिवाय शिकाऊ अनुज्ञप्ती (लर्निंग लायसन्स)ची काही काही सेकंदात चाचणी द्यायची आणि उत्तीर्ण होऊन लायसन्स आरटीओ एजंटच्या मदतीने मिळवण्याचे तसेच ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, ई-चलन इत्यादी सेवांशी संबंधित बनावट वेबसाईट, फसवे मोबाईल ॲप्सव्दारे पाठविल्या जाणाऱ्या खोट्या लिंकव्दारे नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्याची बाब अंशतः खरी आहे. सन २०२२ ते २०२५ या कालावधीत एकूण २८.३२ लाख लर्निंग लायसन्स जारी करण्यात आलेल्या आहेत. चुकीच्या पद्धतीचा वापर करून मिळवलेल्या लर्निंग लायसन्सचा तपास राष्ट्रीय सूचना केंद्र, पुणे व सायबर पोलीस ठाणे, जालना यांच्यामार्फत सुरू आहे. परिवहन विभागाच्या बनावट लिंक तयार करुन वाहन चालक/मालक यांची आर्थिक फसवणूक केल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत. तथापि, वाहन मालकाच्या माहितीची चोरी झाल्याबाबतच्या घटना निदर्शनास आलेल्या नाहीत. मंगळवेढा शहरात आरटीओच्या बनावट ई-चलन लिंक क्लिक केल्यामुळे एका नागरिकाची आठ लाख ४९ हजार ९९३ रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाली आहे. याबाबत मंगळवेढा पोलीस ठाण्यात एफआयआर क्रमांक १०८७/२०२५ दिनांक २६/१२/२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत ३१८(४), ३१९(२) आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अंतर्गत ६६ (उ), ६६(ड) अन्वये गुन्हा दाखल असून पोलीस विभागातर्फे पुढील तपास सुरू आहे.

राष्ट्रीय सूचना केंद्र दिल्ली यांना लर्निंग लायसन्सच्या प्रक्रियेच्या अनुषंगाने गंभीर सुरक्षा उल्लंघनामुळे आणि राष्ट्रीय सुरक्षिततेचा धोका लक्षात घेता सुरक्षा ऑडिट करण्याची विनंती १ डिसेंबर २०२५ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली आहे. राज्यातील वाहन चालक व नागरिक यांना बनावट परिवहन वेबसाईट, मोबाईल ॲप्स तसेच खोट्या ई-चलन लिंकपासून सतर्क रहाण्याकरिता सर्व वृत्तपत्रात प्रसिद्धी देण्याबाबत महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांना ९ डिसेंबर २०२५ रोजी विनंती करण्यात आली आहे. उमेदवाराशिवाय लर्निंग लायसन्स मिळण्याच्या गैरप्रकाराबाबत सहायक मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, जालना यांनी पोलीस ठाणे, सायबर, जि. जालना येथे २६ नोव्हेंबर २०२५ रोजी दाखल केलेल्या तक्रारीस अनुसरून सायबर गुन्हे शाखेत गुन्हा क्रमांक २३/२०२५, कलम ३१८(४), ३३६ (२) (३), ३४० (२), भा.न्या. संहिता सहकलम ४३ (ए) (बी) (एच), ६६(सी), ६६(डी), ७२, ७२(ए) मा.त.क. सहकलम ३,४,७ मो.वा.का. नियम ११ केंद्रीय मोटार वाहन नियम, सहकलम ३७, ३८ आधार अधिनियम २०१६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे व सायबर पोलीस स्टेशनकडून लर्निंग लायसन्स जारी झालेल्या आयपी अॅड्रेसची तपासणी चालू आहे. पोलीस ठाणे सायबर, जि.जालना येथे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी चार आरोपींना अटक केली असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

## मजगाव येथे श्री विठ्ठल रखुमाई व संत गोरोबाकाका मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील मजगाव या गावी श्री विठ्ठल रखुमाई व श्री. संत शिरोमणी गोरोबाकाका मंदिराचा प्राण प्रतिष्ठा सोहळा भक्तीभावाने व विविध कार्यक्रमांनी संपन्न झाला यावेळी कुंभार समाजातील तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मंदिरात येऊन दर्शन घेतले.

मुरुड तालुक्यातील मजगाव मध्ये अठरा पगड जातींबरोबर येथे कुंभार समाजाची वस्ती आहे. त्यांनी ५० वर्षांपूर्वी बांधलेले विठ्ठल रखुमाई व संत शिरोमणी गोरोबाकाका यांचे सुंदर मंदिर काही वर्षांपासून जीर्ण झाले होते. मंदिर गावातील प्रमुख धार्मिक केंद्रा पैकी एक आहे. त्यामुळे सदर मंदिर जीर्णोद्धार करण्याचे समाज बांधवानी दोन वर्षांपूर्वी ठरवले. विशेष म्हणजे कोणत्याही राजकीय व्यक्ती किंवा धनिकाडून मंदिरास मदत न घेता समाज बांधवांनी स्व: वर्गणीतून मंदिराचा जीर्णोद्धार केला.



या तीन दिवसीय सोहळ्यात समाजातील विविध मान्यवरांनी मंदिरात विठ्ठल रखुमाई व संत गोरोबाकाकांचे दर्शन घेऊन मंदिर लोकार्पण बद्दल समाजाचे आभार मानले. यावेळी नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य ज्योती रमेश नागावकर, विघ्नेश माळी, पंचायत समिती सदस्य नात्ती यांचे सत्कार करण्यात आला.हा सोहळा यशस्वी होण्यासाठी समाजाचे अध्यक्ष मंगेश बिरवाडकर, उपाध्यक्ष विजय घोसाळकर, सेक्रेटरी निलेश बिरवाडकर, अजय घोसाळकर, खजिनदार संदेश बिरवाडकर, योगेश बिरवाडकर तसेच समाजाचे कार्यकर्ते विनायक बिरवाडकर, राजेंद्र नांदगावकर, सिद्धेश घोसाळकर, निकेश पालवणकर, संतोष घोसाळकर, सचिन रातवडकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सुपारी देऊन खून करणाऱ्या आरोपीला आजन्म कारावास

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील कुरूळ येथे वडिलोपार्जित मिळकतीच्या वादातून सुपारी देवून केलेल्या खून प्रकरणी अलिबाग सत्र न्यायालयाने एकास आजन्म कारावास आणि वेगवेगळ्या कलमान्वये ६० हजार रूपये दंडाची शिक्षा सुनावली. त्याच्या दुसऱ्या साथीदाराला न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. समीर उर्फ लालदेव चव्हाण असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.




यातील फिर्यादी व आरोपी राजेंद्र प्रकाश मगर हे सख्खे भाऊ असुन त्यांच्यामध्ये वडीलोपार्जित मिळकतीवरुन तीन वर्षापासुन वाद चालु होता. ३१ मार्च २०१९ रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास यातील फिर्यादी त्यांच्या मित्रासह अलिबागजवळच्या कुरुळ मधील दत्तटेकडी येथे मोटार सायकलवर उभे असताना यातील आरोपी राजेंद्र मगर रा. अलिबाग, निलेश वाघमारे रा. अलिबाग आणि समीर उर्फ लालदेव चव्हाण रा. महादेवनगर ता. हवेली जि. पुणे हे तिघेजण त्यांच्या पाळतीवर होते. त्याचवेळी समीर ऊर्फ लालदेव चव्हाण याने त्यांच्यावर गोळीबार केला. यात फिर्यादी यांच्याबरोबर असलेला मित्र सागर पाटील ठार झाला तर गौरव भगत गंभीर जखमी झाला.

या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. अलिबागचे तत्कालीन पोलीस निरीक्षक के. डी. कोल्हे आणि त्यांचे सहकारी ए. ए. सानप यांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. या खटल्याची सुनावणी पूर्ण झाली असून न्यायालयाने आरोपी समीर उर्फ लालदेव चव्हाण यास कलम ३०२ मध्ये आजन्म कारावास व २५ हजार रुपये द्रव्य दंड, कलम ३०७ मध्ये १० वर्ष सक्षम कारावास व २५ हजार रुपये द्रव्य दंड व आर्म ॲक्ट मध्ये २ वर्ष शिक्षा व १० हजार रुपये द्रव्य दंड अशी शिक्षा ठोठावण्यात आलेली आहे. निलेश दशरथ वाघमारे यांना निर्दोष सोडण्यात आले. यातील प्रमुख आरोपी राजेंद्र मगर हा मरण पावला आहे.या खटल्यात सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील ॲड. संतोष पवार यांनी काम पाहिले. त्यांना पैरवी अधिकारी सुनील डोंगे व एस. बी. खैरनार यांचे सहकार्य लाभले.

## निवडक

### अपघातामध्ये तरुणाचा मृत्यू


**पनवेल :** ट्रेलरने दुचाकीला दिलेल्या धडकेत राहुलकुमार श्यामनारायण मिश्रा याचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात कंटेनर ट्रेलर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल कुमार हा त्याच्या दुचाकीने देना बँक तळोजा एमआयडीसी येथून कल्याणकडे जाणाऱ्या रस्त्याने जात असताना हिं डालको कंपनीसमोर कल्याणकडे जाणाऱ्या रोडवर तळोजा एमआयडीसी येथे भरधाव कंटेनर ट्रेलरचालकाने त्याच्या दुचाकीला जोराची धडक दिली. यात राहुलकुमार याचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### एसीची कॉपर ट्युब चोरली

**पनवेल :** अज्ञात चोरट्यांनी क्लिनिक बाहेरील एसी ची कॉपर ट्यूब चोरून नेल्याची घटना करंजाडे येथे घडली आहे. करंजाडे, सेक्टर २ येथील शॉप नंबर ६, आदिती गार्डन, प्लॉट नंबर ४४A, 'Sanvika's I dent dental clinic बाहेरील एसीची कॉपर ट्यूब कापून चोरून नेली आहे. ही सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेरात चित्रित झाली आहे. याबाबत पनवेल पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली.

### एक जण हरवल्याची तक्रार

**पनवेल :** राहत्या घरातून एक व्यक्ती कोठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. जगन रघुनाथ भोई (रा. रोशन पाटील यांची वीटभट्टी),



उंची फुट, रंग गोरा, चेहरा उभट, नाकपरसट, डोळे काळे, अंगात हाफ गुलाबी टि शर्ट समोरील बाजुस गणपतीचा फोटो तसेच त्यावर ॐ साई गणेश मित्र मंडळ सायदे बोरीची वाडी असे लिहलेले, पांढरी जिन्स, हातात घड्याळ, काळी चप्पल असून त्याला मराठी आणि कातकरी भाषा अवगत आहे. ही व्यक्ती दिसल्यास खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पोलीस शिपाई कोळी, खांदेश्वर पोलीस ठाणे, यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि सौ. शकुंतला ठाकूर यांच्या लग्नाचा ५३वा वाढदिवस मंगळवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने मल्हार नेटवर्क प्रा. लि.चे संचालक स्वप्नील ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**

# तळोजा परिसरात सव्वा कोटीचे अमली पदार्थ जप्त

## दोन आरोपी मुद्देमालासह ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात अमली पदार्थ तस्करीविरोधात नवी मुंबई पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईमुळे मोठे रॅकेट उघडकीस आले आहे. तळोजा येथील घोटकॅम्प परिसरात सोमवारी दुपारी करण्यात आलेल्या कारवाईत पोलिसांनी अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या दोन तरुणांना अटक करून सुमारे एक कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईमुळे पंजाब येथून तळोजा परिसरात होणाऱ्या अमली पदार्थ तस्करीचे पुन्हा एकदा धागेदोरे समोर आले आहेत. तळोजा येथील घोटकॅम्प परिसरातील महावीर मॅजेस्टी या इमारतीमधील एका सदनिकेत अमली पदार्थ विक्रीसाठी आणले जाणार असल्याची गोपनीय माहिती नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अमली पदार्थ विरोधी कक्षाला मिळाली होती.




या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने या ठिकाणी छापा टाकला. छाप्यात पिवळसर रंगाचे खडे असलेले हेरॉईन तसेच तपकिरी रंगाची अफू पावडर प्लास्टिक पिशव्यांमध्ये आढळून आली. तज्ज्ञांकडून तपासणी केल्यानंतर ११८ ग्रॅम वजनाचे हेरॉईन आणि १४३.६ ग्रॅम वजनाची अफू पावडर जप्त करण्यात आली. या अमली पदार्थांची एकूण बाजारभावानुसार किंमत एक कोटी दोन लाख आठ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. यासोबतच चार वजनकाटे, दहा इंजेक्शन तसेच सुमारे दीडशे प्लास्टिक पिशव्याही जप्त करण्यात आल्या आहेत.

या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात २४ वर्षीय सुरींदर गुरजंत सिंग उर्फ काळू आणि २७ वर्षीय मनिंदर गुरजंत सिंग यांच्याविरोधात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरींदर आणि मनिंदर हे यापूर्वी कळंबोली वसाहतीमध्ये राहत होते. दरम्यान, हा अमली पदार्थ पंजाब येथून आणणारा ट्रक चालक फरार असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.

नवी मुंबई पोलिसांनी गेल्या दोन वर्षांत अमली पदार्थप्रकरणी सुमारे २०० गुन्हे दाखल करून जवळपास ९६ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांविरोधातही मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्याचे आदेश नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिल्याने प्रत्येक पोलीस ठाण्यात दिवसाला एक तरी अमली पदार्थ सार्वजनिक रित्या सेवन करणा-याला पकडून त्याच्या कारवाई केली जाते. यामुळे काही अंशी का होईना सार्वजनिक ठिकाणी अमली पदार्थ सेवनावर नियंत्रण आले आहे.

कारवाईमध्ये सहा. पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे, अतिरिक्त कार्यभार, आर्थिक गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे, सहाय्यक निरीक्षक तुषार माने, हवालदार तायडे, मेहेतर, महिला नाईक पाटील, शिपाई पालवे, चालक भाबड हे सहभागी होते.

## खारघरच्या शिवमंदिराजवळील रस्ता कॉंक्रीटीकरणाचे भूमिपूजन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील सेक्टर १२, शिव मंदिराजवळील रस्ता कॉंक्रीटीकरण कामाचा भूमिपूजन सोहळा पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी झाला.

या वेळी प्रभाग क्रमांक ६चे नगरसेवक नरेश ठाकूर, कीर्ती नवघरे, उषा अजित अडसूळे आणि दीपक शिंदे यांच्यासह नागरिक उपस्थित होते तसेच या रस्त्याच्या कामासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे ॲड. अमर उपाध्याय आणि स्थानिक नागरिकांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणामुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार असून वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होणार आहे. स्थानिकांनी या कामाबद्दल समाधान व्यक्त करत महापालिकेचे, अमर उपाध्याय भाजपच्या स्थानिक नगरसेवकांचे आभार मानले.

पनवेल महानगरपालिका परिसरातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी अशा विकासकामांना प्राधान्य देण्यात येईल, असे आश्वासन यावेळी महापौर पाटील यांनी दिले.



## पनवेल महानगरपालिकेतर्फे गटारे आणि तलाव स्वच्छता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका कार्यक्षेत्रातील पनवेल मधील उरण नाका तसेच कळंबोली येथे मंगळवारी (दि.२४) स्वच्छता दूत व औषध फवारणी कर्मचारी यांच्या मार्फत संयुक्तरित्या 'गटारींची स्वच्छता व औषध फवारणी' मोहीम घेण्यात आली. या विशेष मोहिमेंतर्गत गटारींची स्वच्छता आणि डास प्रतिबंधक उपाययोजनाकामी औषध फवारणी एकत्रित केल्याने तेथील नागरिक तसेच व्यापारी वर्गाने समाधान व्यक्त केले.



स्वच्छ व सुंदर पनवेल बनविण्याच्या दृष्टीने महापालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम घेण्याबाबत आयुक्त मंगेश चितळे यांनी सूचना दिल्या आहेत. त्यानूसार पनवेल शहरात उरण नाका व कळंबोलीमध्ये आज विविध ठिकाणी 'गटर स्वच्छता व औषध फवारणी' विशेष मोहिम उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांच्या देखरेखीखाली व स्वच्छता निरीक्षक यांच्या माध्यमातून ही मोहिम राबविण्यात आली.

खांदा कॉलनी, सेक्टर २, मधील खांदेश्वर तलाव परिसरात नुकतीच विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. ही मोहीम संत निरंकारी मिशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. या मोहिमेदरम्यान तलावातील कचरा, प्लास्टिक तसेच जलवनस्पती काढून टाकण्यात आल्य. तसेच संपूर्ण परिसराची सखोल साफसफाई करण्यात आली. या स्वच्छता मोहिम अंतर्गत एकूण ४०० सदस्यांनी तसेच स्वच्छता दुतानी सहभागी घेतला. मोहिमेतून एकूण १० टन घनकचरा जमा करण्यात आला

यावेळी नागरिकांना तलावात किंवा परिसरात कचरा न टाकण्याचे व स्वच्छता व पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

## कळंबोली भाजपतर्फे कॉंग्रेसचा निषेध

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

एआय इम्पॅक्ट समिटमध्ये युवक कॉंग्रेसकडून करण्यात आलेल्या आंदोलनाच्या निषेधार्थ कळंबोली येथील जनसंपर्क कार्यालयात उत्तर रायगड जिल्हा महिला मोर्चाच्या अध्यक्षा प्रिया मुकादम यांच्या नेतृत्वाखाली जोरदार निषेध आंदोलन करण्यात आले.




यावेळी पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर प्रमिला रविनाथ पाटील या प्रमुख उपस्थित होत्या. तसेच मंडळ अध्यक्ष अमर अरुण पाटील, जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, नगरसेवक बबन मुकादम, रवी भगत, शशिकांत शेळके, नगरसेविका दमयंती भोईर, अमर ठाकूर, सरचिटणीस दिलीप बिष्ट, उपाध्यक्ष संदीप भगत, विनोद बोरसे, सचिव विलास किते, नीलेश भोईर, राजेंद्र बागल, उत्तर भारतीय जिल्हा सरचिटणीस राजेश पांडे, प्रकाश शेलार, मनीष तिवारी, सुनीता हिरावले, विद्या फरांदे तसेच इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निषेध आंदोलनातून संबंधित घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला.

## 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे सामूहिक गीत गायन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिखांचे नववे गुरु, हिंद दी चादर परमपूज्य श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या ३५०व्या शहिदी समागमनिमित्त सीकेटी विद्यालयात सोमवारी (दि.२३) सकाळी ८.३० वाजता सामूहिक गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या ऐतिहासिक उपक्रमात सीकेटी विद्यालयातील इंग्रजी प्राथमिक व माध्यमिकचे मिळून एकूण १८३८ विद्यार्थी शिक्षक व कर्मचारी एकाच वेळी सहभागी झाले. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ करणे, हा या उपक्रचा हेतू आहे.



हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूरजींच्या स्मृतीनिमित्त २३ फेब्रुवारी रोजी विद्यालयाच्या मैदानात मुख्य 'शहिदी समागम' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने प्रसिद्ध गायक सरताज सिंग यांनी गुरुजींच्या जीवनावर आधारित एक प्रेरणादायी गीत गायले असून हे गीत २३ फेब्रुवारी रोजी विद्यार्थ्यांनी सकाळी ८.३० वाजता गायले. यावेळी शाळेतील संगीत शिक्षक रुपेश मढवी आणि तबलावादक खरे सर आणि विद्यार्थी गायक वृंद यांनी विशेष सहकार्य केले.

गुरुजींच्या बलिदानाची आणि शौर्याची माहिती घ्यावी, तसेच या उपक्रमातून नवीन पिढीला राष्ट्रीय एकात्मतेची शिकवण मिळेल या दृष्टीने याचे आयोजन करण्यात आले होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे चित्रीकरण ड्रोनच्या माध्यमातून करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी तहसीलदार, सामान्य प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय कोकण भवन गजानन धुमाळ, पंचायत समिती सदस्य कांचन जोशी, हुद्दार मॅडम, चांगू काना ठाकूर विद्यालय मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक कैलाश सत्रे, त्याचबरोबर मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मुख्याध्यापिका निलिमा शिंदे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, उपस्थित होते.

## लक्ष्मी विष्णू सोसायटीत सोलर पॅनलचे लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथे रविवारी (दि.२२) सेक्टर १६ येथील लक्ष्मी विष्णू सोसायटीमध्ये नवनिर्वाचित नगरसेविका डॉ. प्रियांका तेजस कांडपिळे यांचा सत्कार समारंभ उत्साहात झाला. यावेळी त्यांच्या हस्ते सोसायटीमध्ये बसविण्यात आलेल्या सोलर पॅनलचे लोकार्पण करण्यात आले.



या कार्यक्रमाला भाजपच्या जिल्हा सरचिटणीस तथा माजी उपमहापौर चारुशिला घरत तसेच माजी नगरसेवक तेजस कांडपिळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पर्यावरणपूरक ऊर्जेचा अवलंब करून लक्ष्मी विष्णू सोसायटीने समाजापुढे आदर्श निर्माण केला असल्याचे भाजपच्या जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत यांनी सांगितले. कार्यक्रमात सोसायटी पदाधिकारी व रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात रोजगार मेळावा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सेंटर फॉर करिअर गायडन्स ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलतर्फे शुक्रवारी (दि.२७) सकाळी ११ वाजता आजी व माजी विद्यार्थ्यांसाठी रोजगार मेळावा घेण्यात येणार आहे.

या भव्य रोजगार मेळाव्यामध्ये १० पेक्षा जास्त नामवंत कंपनी महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये येऊन विद्यार्थ्यांची निवड करणार आहेत त्यामध्ये प्रामुख्याने टाइम्स प्रो, लाईव्ह टेक इंडिया व आय कॅन मेंटॉर्स अशा नामवंत कंपन्यांचा समावेश आहे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

रोजगार मेळाव्यामध्ये विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून पात्र उमेदवारांची थेट मुलाखत घेणार आहेत. वाणिज्य, विज्ञान तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ घेता येणार आहे. महाविद्यालयाच्या सेंटर फॉर करिअर गायडन्स व प्लेसमेंट सेलतर्फे विद्यार्थ्यांना पूर्वतयारीसाठी विशेष मार्गदर्शन सत्रांचे आयोजनही करण्यात आले आहे.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, प्रा. प्रथमेश उदेकर समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व प्रा. अर्पिता नायक, समन्वयक, सेंटर फॉर करिअर गायडन्स ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल यांनी नवी मुंबईमधील मुंबई विद्यापीठा सलग्नित महाविद्यालयातील तसेच रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील माजी विद्यार्थी व विद्यमान विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. रोजगार मेळाव्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मेहनत घेत आहेत.

## ओरियन मॉलमध्ये पोलिसांकडून मॉकड्रिल

**पनवेल : वार्ताहर**


पनवेल शहरातील ओरियन मॉल येथे आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्याच्या दृष्टीने व्यापक मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले. संभाव्य दहशतवादी हल्ला, आग किंवा अन्य आपत्तीजन्य परिस्थितीत समन्वय साधत तत्काळ प्रतिसाद देण्याची क्षमता तपासण्यासाठी ही रंगीत तालीम घेण्यात आल्याचे या वेळी सांगण्यात आले.

हे मॉकड्रिल पनवेल शहर पोलीस ठाणे यांच्या पुढाकाराने घेण्यात आले. यात वपोनि. नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पोलीस निरीक्षक, आठ अंमलदार, बीट मार्शल १, २ व ३ वरील अंमलदार, क्यूआरटी पथकाचे २९ अंमलदार, एटीसीचे दोन अंमलदार, सुरक्षा शाखेचा एक अधिकारी, झोन ३ स्ट्राइकिंग पथकासह एक अधिकारी व आठ अंमलदार, विशेष शाखेचे दोन अंमलदार तसेच एटीएसचा एक अंमलदार यांचा सहभाग होता.

याशिवाय अग्निशमन दलाचे पथक, ओरियन मॉलचे सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक आणि रुग्णवाहिकेची टीमही उपस्थित होती. सर्व संबंधित यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय साधत बचावकार्य, नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा सराव करण्यात आला.



## उरणमध्ये सुपर-स्पेशालिटी डॉक्टरांच्या ओपीडीचा शुभारंभ




**उरण : प्रतिनिधी, बातमीदार, वार्ताहर**

उरण तसेच ग्रामीण परिसरातील नागरिकांसाठी नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या वतीने आता सुपर-स्पेशालिटी डॉक्टरांची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या उपक्रमांतर्गत मूत्रविकार तसेच मूत्रपिंडाशी संबंधित आजारांवरील तज्ज्ञ डॉक्टरांच्या ओपीडीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नेफ्रॉलॉजी उपचारांसाठी इंटरव्हेन्शनल नेफ्रोलॉजिस्ट डॉ. अमर कुलकर्णी हे दर महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या शनिवारी दुपारी १२ ते २ या वेळेत उपलब्ध राहणार आहेत. ऑर्थोपेडिक्स व स्पाइन सर्जन डॉ. अरविंद जे. वाटकर हे महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी दुपारी २ ते ४ यावेळेत उपलब्ध असतील.

ऑर्थोपेडिक्स विभागाचे संचालक, रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट, स्पोर्ट्स इंज्युरी आणि ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. श्रवण कुमार पवार हेदेखील दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी २ ते ४ या वेळेत रुग्णसेवेसाठी उपलब्ध असतील. युरोलॉजिस्ट डॉ. विकास भिसे हे दर महिन्याच्या बुधवारी दुपारी १२ ते २ या वेळेत उपलब्ध राहणार आहेत. रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट आणि ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. प्रमोद भोर हे दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी दुपारी २ ते ४ या वेळेत उपलब्ध राहणार आहेत. हृदयविकार तज्ज्ञ डॉ. तामरीउद्दीन धनावडे दर महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी दुपारी १२ ते २ या वेळेत उपलब्ध राहतील. दर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी दुपारी १२ ते २ या वेळेत पोटविकार तज्ज्ञ डॉ. रावसाहेब राठोड यांच्या ओपीडीचा लाभ घेता येईल. ही वैद्यकीय सेवा पालवी हॉस्पिटलमध्ये दुपारी १२ ते २ व दुपारी २ ते ४ या वेळेत उपलब्ध होणार आहे.

याकरिता पुर्व नोंदणी आवश्यक असून गरजूंनी ८६५५८४५८६६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय

# विमानप्रवासाविषयी चिंता

गेल्याच महिन्यात झालेला अजित पवार यांच्या विमानाचा अपघात सगळ्यांच्याच स्मरणात ताजा असताना सोमवार–मंगळवारच्या विमान व हेलिकॉप्टरसंबंधी दुर्घटनांनी पुन्हा एकदा देशातील विमानप्रवासाच्या सुरक्षेविषयी मोठी चिंता व्यक्त होते आहे. हवाई वाहतूक क्षेत्रातही या घटनांमुळे अस्वस्थता असून विमानांच्या तांत्रिक तपासणीकडे अधिक लक्ष देण्याची गरज दिसते आहे.

**झारखंडहून दिल्लीला निघालेल्या एका खाजगी लहान विमानाचा सोमवारी रात्री भीषण अपघात होऊन सात जण ठार झाले तर लंडनहून हैदराबादच्या दिशेने जाणाऱ्या ब्रिटिश एअरवेजच्या विमानाचे मंगळवारी पहाटे नागपूर विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. मंगळवारी सकाळी अंदमानमध्ये पवनहंसचे हेलिकॉप्टर कोसळले तर दिल्लीहून लेहकडे जाणाऱ्या स्पाइसजेटच्या विमानातही काही तांत्रिक बिघाडामुळे आग लागल्याचे दिसताच पायलटने प्रसंगावधान राखून दिल्ली विमानतळावर सुरक्षित लँडिंग केले. या चार घटनांपैकी झारखंडचा विमानअपघात वगळता अन्य तिन्ही घटनांमध्ये सारे प्रवासी सुखरूप आहेत. पण तरीही स्वाभाविकपणे विमानप्रवासाच्या सुरक्षिततेविषयी पुन्हा मोठी चर्चा सुरू झाली आहे. झारखंडच्या रांची विमानतळावरून सोमवारी उड्डाण केलेले विमान ही एक खाजगी चार्टर्ड रुग्णवाहिका होती. खराब हवामानामुळे या एअर म्ब्युलन्सचा अपघात झाला असावा. संपर्क तुटताच तपासयंत्रणांनी विमानाचा शोध सुरू केला. ज्या भागात हे विमान कोसळले तेथील वातावरण अचानक बदलल्यामुळे हा अपघात झाला असावा अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विमानातील सातही जणांचा या अपघातात मृत्यू झाला आहे. सायंकाळी ७ वाजून ११ मिनिटांनी उड्डाण केलेल्या या विमानाचा शेवटचा संपर्क ७ वाजून ३४ मिनिटांनी झाला होता. एकाच कुटुंबातील रुग्णासह एकूण तीन जण, दोन वैमानिक, एक डॉक्टर व एक वैद्यकीय सहाय्यक यांचा मृतांमध्ये समावेश आहे. रेडबर्ड एअरवेज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे हे विमान होते. डीजीसीएकडील माहितीनुसार देशात २०२० पासून पाच वर्षांत ५३ नागरी हवाई अपघात नोंदवले गेले आहेत. यापैकी बहुसंख्य अपघात हे लहान विमाने, प्रशिक्षणासाठीची उड्डाणे व हेलिकॉप्टर यांचे आहेत. मानवी त्रुटी, तांत्रिक बिघाड, देखभालीचा अभाव आणि खराब हवामान ही कारणे विमान अपघातांमागे असल्याचे तज्ज्ञांकडून अनेकदा सांगितले गेले आहे. प्रशिक्षण सुरू असताना होणाऱ्या विमान अपघातांत मानवी त्रुटींचे प्रमाण स्वाभाविकपणे अधिक असते. निर्णय घेताना वैमानिकाकडून चूक झाल्यास अपघात घडतात. थकवा वा लक्ष विचलित होणे ही कारणेही अपघातांमागे आढळतात. विमानातील तांत्रिक बिघाड हेही दुसरे महत्त्वाचे कारण अनेकदा दिसते. व्यावसायिक विमानांच्या तुलनेत प्रशिक्षणासाठी वापरली जाणारी विमाने, लहान विमाने, खासगी विमाने व हेलिकॉप्टर यांच्या अपघातांचे प्रमाण जास्त असल्याचे आकडेवारी दर्शवते. विमान व हेलिकॉप्टरचे अपघात टाळण्यासाठी व विमानउड्डाणे अधिक सुरक्षित करण्यासाठी या लहान व खासगी विमानांची नियमित व दर्जेदार देखभाल अनिवार्य करणे आवश्यक आहे. वैमानिक व तांत्रिक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण अधिक सखोल करून त्यासोबतच थकव्याचे व्यवस्थापन, उड्डाणांसंदर्भातील शिस्त, इंधन नियोजन आदी बाबतीत अधिक दक्ष राहण्याची गरज आहे असे सांगितले जाते. याला हवामानविषयक अद्ययावत माहिती, सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि डीजीसीएकडून उड्डाणक्षमतांच्या नियमित तपासण्या यांची जोड मिळाल्यास हवाई अपघातांचे प्रमाण कमी होऊ शकेल असे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे. सुरक्षाविषयक ऑडिट व देखरेख अधिक नियमितपणे केली जाण्याचीही गरज आहे.**

# हिंद दी चादर – शाश्वत ढालची गाथा





अहा! शोध: आजच्या पेचप्रसंगाचे कालचे उत्तर ठाण्यातील उपवन तलावाच्या शांत काठावर फिरताना किंवा आधुनिक शहराच्या डिजिटल आवाजात उभे असताना, आपण अनेकदा सीमा बद्दल बोलतो – माझे घर, माझा समुदाय, माझी वैयक्तिक जागा. पण आपण थांबून चिंतन करूया: आपण कधी त्या इतिहासाबद्दल विचार करतो का ज्याने आपल्याला हे विचार करण्याचे स्वातंत्र्य दिले?

१७व्या शतकातील अशा क्षणाची कल्पना करा जिथे एक माणूस स्वतःच्या हक्कांसाठी नाही तर ज्यांच्या श्रद्धा त्याच्या स्वतःच्या श्रद्धांपेक्षा पूर्णपणे वेगळ्या होत्या त्यांच्या हक्कांसाठी उभा राहिला. हा या मालिकेतील अहा! क्षण आहे: नवव्या गुरूंनी केवळ एका धर्माचे रक्षण केले नाही; त्यांनी विविधतेची कल्पनाच रक्षण केली. ज्या वेळी जगाला एकतर/किंवा संघर्षात भाग पाडले जात होते, तेव्हा त्यांनी सह–अस्तित्वाचा मार्ग निवडला. आपल्या आधुनिक जगात, असहिष्णुतेशी झुंजत असताना, हे १,६७५ वर्षांचे बलिदान आपला सर्वात शक्तिशाली रोडमॅप आहे.

**२. लयबद्ध कथा: तो काळ, तो महान त्याग (पु ला शैली)**

आता डोळे बंद करा आणि १६७५ मध्ये दिल्लीच्या रस्त्यांची कल्पना करा. हवा जड होती, फक्त कडक उन्हामुळेच नाही तर भयानक शांतताही होती. सामान्य गोष्टीत असामान्यता शोधणारे महान पु.ल. देशपांडे यांच्या शैलीत, आनंदपूरच्या दरबारातील दृश्याची कल्पना करा. काश्मिरी ब्राह्मणांचा एक छोटासा गट, त्यांचे चेहरे हजारो मैलांच्या प्रवासाच्या धुळीने कोरलेले होते आणि त्यांच्या डोळ्यांत पूर्णपणे मिटण्याची भीती होती, ते गुरूंसमोर उभे होते.

ते युद्धासाठी सेनापती शोधत नव्हते; ते 'चादर' शोधत होते – त्यांच्या अस्तित्वासाठी एक संरक्षक कवच. गुरु तेग बहादूरजींनी त्यांच्याकडे पाहिले. त्यांच्या डोळ्यांत एका खोल, प्राचीन सरोवराची शांतता होती. त्यांना जाणवले की 'टिळक' आणि 'जनेऊ' हे केवळ धार्मिक धागे किंवा खुणा नाहीत; ते मानवी आत्म्याच्या स्वातंत्र्याचे चिन्ह आहेत. पु लाचे भाषांतर करायचे तर, मानवांमध्ये मानव राहणे हा सर्वात मोठा चमत्कार आहे. आणि या चमत्काराचे रक्षण करण्यासाठी, गुरुंनी दिल्लीला आपला प्रवास सुरू केला – साम्राज्याच्या बंदिवान म्हणून नव्हे तर भीतीवर विजय मिळवणाऱ्या म्हणून.

**३. आरसा व्यायाम: विवेकाशी संवाद**

आजच तुमच्या आरशासमोर उभे राहा आणि स्वतःला विचारा: जर तुम्ही एखाद्याचे हक्क पायदळी तुडवलेले पाहिले – ज्याच्या विचारसरणीशी तुम्ही असहमत असाल – तर तुम्ही त्यांची ढाल व्हाल का? गुरूंचे बलिदान आपल्याला विचारते की आपले सत्य दुसऱ्याच्या सत्याला सामावून घेण्याइतके मोठे आहे का. उभ्या विचारसरणीसाठी आपल्याला आपले मूळ पात्र शोधण्यासाठी जात, पंथ किंवा राष्ट्रीयत्वाच्या लेबलांपेक्षा खोलवर जाणे आवश्यक आहे.

**४. रीच तत्वज्ञान एकत्रीकरण**

जबाबदारी: गुरुंनी एक ओझे स्वीकारले जे संकुचित अर्थाने त्यांचे नव्हते. त्यांनी आपल्याला शिकवले की समाजाचे रक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे प्राथमिक कर्तव्य आहे. सहानुभूती: त्यांनी पीडितांचे अश्रू स्वतःच्या हृदयात सामावून घेतले. सहानुभूती, जेव्हा सक्रिय होते तेव्हा, ऐतिहासिक बदलासाठी उत्प्रेरक बनते. जागरूकता: त्यांना त्यांच्या काळातील राजकीय क्रूरतेची पूर्ण जाणीव होती, तरीही त्यांनी आध्यात्मिक धैर्य हे त्यांचे शस्त्र म्हणून निवडले.करुणा: इतरांचा सन्मान उंचावण्यासाठी स्वतःचे डोके देणे – करुणेची यापेक्षा मोठी व्याख्या आहे का? सुसंवाद: जग हे एक सामायिक बाग आहे. ज्याप्रमाणे एक माळी प्रत्येक फुलाचे रक्षण करतो, त्याचप्रमाणे गुरूंनी आपला सामायिक वारसा जपला.

**५. महाराष्ट्र संगम: सह्याद्री आणि पंजाबमधील आध्यात्मिक सेतू**

जरी हे बलिदान दिल्लीत झाले असले तरी त्याचे प्रतिध्वनी महाराष्ट्राच्या सह्याद्री पर्वतांमध्ये पसरले. संत ज्ञानेश्वरांपासून ते तुकाराम महाराजांपर्यंत, आपल्या संतांनी सातत्याने उपदेश केला आहे: जो पीडितांना आपले म्हणतो, तोच खरा देव जाणतो. 'भूतादय' (सर्व प्राण्यांबद्दल करुणा) ची वारकरी भावना आणि 'सेवा' ही शीख परंपरा ही एकाच शाश्वत सत्याची दोन नावे आहेत. महाराष्ट्र आणि पंजाब हे भारताच्या आध्यात्मिक शरीराचे दोन फुफ्फुस आहेत, जे स्वाभिमानाचा समान प्राणवायू श्वास घेतात.

**६. शब्दाची शक्ती: 'सत श्री अकाल' आणि 'हिंद दी चादर'**

जेव्हा आपण सत श्री अकाल म्हणतो तेव्हा आपण 'सत्य' ( सत ) 'कालातीत' ( अकाल ) असल्याचे प्रतिपादन करतो. गुरूंनी हे सिद्ध केले की शरीर नश्वर असले तरी सत्यासाठी केलेले बलिदान अमर आहे. हिंद दी चादर : ही केवळ एक पदवी नाही. ज्याप्रमाणे 'चादर' (ढाल/चादर) एखाद्याला कडक उन्हापासून किंवा गोठवणाऱ्या थंडीपासून वाचवते, त्याचप्रमाणे गुरूंनी भारताच्या सांस्कृतिक रचनेचे सांप्रदायिकतेच्या वाऱ्यांपासून रक्षण केले. जेव्हा एखादा सामान्य माणूस दुसऱ्यासाठी उभा राहतो तेव्हा तो स्वतः 'चादर' बनतो.

**७. पृथ्वी–बंध: जैविक आणि अजैविक यांच्याशी सुसंवाद**

गुरुंचे संपूर्ण आयुष्य नद्या, जंगले आणि पर्वतांमध्ये गेले. त्यांनी निसर्गाला मूक साक्षी ( साक्षी ) मानले. ज्याप्रमाणे मी, ठाण्याचे वृक्षपुरुष म्हणून, रोपट्याला भावी पिढ्यांचा श्वास मानतो, त्याचप्रमाणे गुरुंनी मानवी मूल्यांचे बीज रोवले. जेव्हा 'अजैविक' माती 'जैविक' बीजाला आधार देते, तेव्हा जीवन फुलते. जो समाज आपल्या लोकांच्या हक्कांचे रक्षण करू शकत नाही तो अखेर आपल्या नैसर्गिक वारशाचे रक्षण करण्यात अपयशी ठरेल.

**८. उद्याचे बीज: तरुणांसाठी एक वारसा**

माझ्या तरुण मित्रांनो, ढाल होण्यासाठी तुम्हाला तलवारीची गरज नाही. जेव्हा तुम्ही छळलेल्या समवयस्कांसाठी उभे राहता किंवा आपले पर्यावरण वाचवण्यासाठी एक छोटेसे पाऊल उचलता तेव्हा तुम्ही गुरु तेग बहादूर जींच्या पावलावर पाऊल ठेवत असता. एक प्रिय व्यक्तिमत्व विकसित करा – जे शक्तीने नव्हे तर सेवेच्या भावनेने ओळखले जाते. पहिला टप्पा: मानवतेसाठी बलिदान (मुख्य इतिहास)

**–विजयकुमार कट्टी**
**उपसंचालक (माहिती)**
**कोकण विभाग, नवी मुंबई**






## बदलते तंत्रज्ञान

# आता फक्त बोलण्यानेही होईल तुमचे युपीआय पेमेंट

सध्या अगदी एक रुपयांपासून ते एक लाखांपर्यंत कोणाला पैसे पाठवायचे असतील तरीही गूगल पे त्यासाठी आपल्याकडे २४ तास अव्हेलेबल आहे. एखादी वस्तू घेतली की व्यापाऱ्याकडून किंवा दुकानदाराकडे स्कॅनर मागून, मोबाइलमधील गूगल पे ॲप उघडून स्कॅनरच्या मदतीने पेमेंट करून टाकायचे. पण, अनेकदा हे करताना अमाऊंट (किंमत) च्या जागी चुकून पिन टाकला जातो आणि घोळही होऊ शकतो.




आता अशा चुका होऊ नये म्हणून की काय गूगल पे आपल्या सगळ्यांसाठीच खास फीचर घेऊन येतो आहे. गूगल पे युजर्स एआय फीचर्सचा लाभ घेण्यासाठी तयार आहेत. आता फक्त बोलून यूपीआय पेमेंट करता येणार आहे, असे सांगितले जात आहे.

भारतातील गुगल पे चे प्रमुख उत्पादन व्यवस्थापक, शरथ बुलुसु यांनी सांगितले की, हे व्हॉइस फीचर ॲपद्वारे डिजिटल पेमेंट करण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुलभ करेल. पण, या फीचर्सबद्दलची माहिती सध्या मर्यादित आहे. पण, तरीही व्यवहारांसाठी यूपीआयवर अवलंबून राहणाऱ्या सर्वांसाठी हा अपडेट वा फीचर गेमचेंजर ठरू शकतो.

**.व्हॉईस फीचर :**

गूगल पेमध्ये व्हॉईस कमांड्स सुरू केल्यामुळे जे अशिक्षित आहेत त्यांनाही ऑनलाइन पेमेंट करणे अधिक सोपे होईल. कारण फक्त बोललेल्या सूचनांद्वारे व्यवहार हाताळायचा असणार आहे, म्हणूनच ट्रान्सफॉर्मेटिव्ह व्हॉईस फीचर लवकरच लाँच केले जाईल. कारण गुगल पे ने स्थानिक भाषांमध्ये पेमेंट फॅसिलिटी सुलभ करण्याच्या उद्देशाने भारत सरकारबरोबर सहयोग केला आहे.

या व्यतिरिक्त, भारतात सायबर फसवणुकीचा सामना करण्यासाठी गूगल मशीन लर्निंग आणि एआय तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करत आहे, त्यामुळे हे फीचर वा अपडेट ग्राहकांना ऑनलाइन घोटाळे आणि धोक्यांपासून सुरक्षित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकेल. भारतातील विस्तीर्ण ऑनलाइन बाजारपेठ पाहता, गुगल पे या क्षेत्रात नावीन्य आणण्यास उत्सुक आहे.

# लेखिका गिरिजाबाई केळकर



## निमित्त

स्त्री–जीवनातील समस्या, तिची दुःखे मांडणाऱ्या पहिल्या गद्य लेखिकांपैकी एक म्हणून महत्त्वाच्या ठरलेल्या गिरीजाबाई केळकर यांचा जन्म १६ऑक्टोंबर १८८६ रोजी मुंबईला झाला. त्यांचे माहेरचे नाव द्रौपदी बर्वे होते. त्यांचे वडील बर्वे यांची नोकरी सौराष्ट्रात असल्याने द्रौपदीचे बालपण व शिक्षण गुजरातमध्ये झाले, परंतु न. चिं. केळकर यांचे धाकटे बंधू महादेवराव केळकरांशी द्रौपदीचा विवाह १९०१ साली झाला. त्या गिरीजा महादेव केळकर झाल्या व महाराष्ट्रात आल्या. विवाहानंतर त्या मराठी भाषा शिकल्या व मराठीत त्यांनी प्राविण्य संपादन केले. केळकरांच्या घरच्यांनी गिरीजाबाईंच्या लेखनाला प्रोत्साहन दिल्यामुळे त्या लिहू लागल्या. त्यांनी विपुल व विविध लेखन करून चांगली मान्यता मिळवलीच, शिवाय उत्तम वक्त्या म्हणूनही लौकिक संपादन केला.

त्यांनी १९३१ मध्ये लिहिलेल्या 'संसार सोपान' ह्या पुस्तकाच्या प्रास्ताविक प्रकरणाचा आरंभ 'गृहिणी गृहाची शोभा। गृहिणी सुखाचा गाभा। गृहिणी आनंदाचा ठेवा। ऐशी गृहिणी लाभे तो भाग्यवंत देवा।।' या हृद्य काव्यपंक्तींनी केला आहे. त्यांच्या कथा–नाटकांतले अनुभवाचे विश्व रोजच्या जीवनातले व कौटुंबिक आणि घरगुती स्वरूपाचे आहे. नव्या–जुन्याचा संगम माणसाला पुढे नेतो, अशी त्यांची धारणा होती. त्याचबरोबर सुगृहिणी व सुगरण बनविण्याकडे त्यांचा कल दिसून येतो. शरीरसंवर्धन व पोषण अन्नावर अवलंबून असते, असे प्रतिपादन करून त्या म्हणतात, 'ज्या सॅनिटेशनच्या नावाने तुम्ही इतके ओरडता, त्या सॅनिटेशनच्या तत्त्वावर रचलेली आमची हिंदू राहणी आहे.' संसारी स्त्रियांना मार्गदर्शक व बोधपर असे विपुल स्फुट लेखनही गिरीजाबाईंनी केले आहे. 'नाही निर्मळ जीवन काय करील साबण?' असे त्या मार्मिकपणे विचारतात.

जुन्यातले चांगले ते जोपासण्याकडे गिरीजाबाईंची वृत्ती दिसते. त्यांची एकंदर वृत्ती सात्त्विक आहे, हे त्यांच्या लिखाणातून जाणवते. त्यांच्या लेखनगुणांत उत्तरोत्तर वाढ झाली व तत्कालीन संस्कारशील मध्यमवर्गीयांचे प्रातिनिधिक ठरू शकेल, असे लेखन त्यांनी केले. 'मनोरंजन', 'ज्ञानप्रकाश', 'खानदेश वैभव' इत्यादी नियतकालिकांतून त्यांचे लेख प्रसिद्ध झाले. 'पुस्तकी शीक नि व्यवहाराची भीक' (१९१४), 'पुरी हौस फिटली' (१९१६) या कादंबर्या; 'अंगठीचा प्रभाव' (१९२७) ही दीर्घ सामाजिक कथा; 'स्वभावचित्रे', भाग १ (१९२३), भाग २ (१९३४), 'केवळ विश्रांतीसाठी' (१९२६) कथासंग्रह; 'पुरुषाचे बंड' (१९१३), 'आयेषा' (१९२१), 'राजकुंवर' (शिरकाणाचा सूड) (१९४१), 'हीच मुलीची आई' (१९३२), 'मंदोदरी' (१९५७) ही नाटके त्यांनी लिहिली. त्यांच्या काही पुस्तकांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या, त्यांचे 'द्रौपदीची थाळी' (१९५९) हे आत्मवृत्त असून स्त्री–शिक्षणाचे महत्त्व सांगणारे आणि पतिपरायण संसारी स्त्रीचे साधेसुधे जिव्हाळ्याने भरलेले हे आत्मनिवेदन आहे.उल्लेखनीय बाब म्हणजे १९२८ साली मुंबईत भरलेल्या नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद गिरीजाबाईंना देऊन त्यांचागौरव करण्यात आला होता. अशा या महान लेखिकेचे निधन २५ फेब्रुवारी १९८० रोजी झाले.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तुरटी ठेवते तोंडाचे आरोग्य चांगले

तुरटी जवळजवळ प्रत्येक घरात सहज आढळते. तुरटीचा वापर प्रामुख्याने पाणी शुद्धीकरण, सौंदर्यप्रसाधने, वैयक्तिक स्वच्छता आधारित उत्पादने आणि अन्न जतन करण्यासाठी केला जातो. याशिवाय, तुरटी त्वचेला निरोगी बनवते आणि किरकोळ दुखापतींमुळे होणारा रक्तस्त्राव थांबवण्यास मदत करते. तुरटीमध्ये दाहक–विरोधी आणि अँटी–ऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे जखमा बरे करण्यास मदत करतात. तथापि, तुरटी फक्त शरीराच्या बाह्य भागांवरच वापरली जाऊ शकते. माउथवॉशसाठी तुरटी वापरणे फायदेशीर आहे. त्यात असलेले अँटीमायक्रोबियल गुणधर्म डेंटल प्लेक तयार होण्यास प्रतिबंध करतात.



डेंटल प्लेक म्हणजे दातांवर असलेले बॅक्टेरियाचे चिकट थर. तुरटी स्फटिकाच्या स्वरूपात असो किंवा पावडरच्या स्वरूपात, ती अनेक गुणधर्मांनी समृद्ध असते. त्यात अँटीपर्स्पिरंट गुणधर्म आहेत, जे घाम नियंत्रित करण्यास मदत करतात. टूथपेस्टमध्येही तुरटीचा वापर केला जातो, कारण ते दात मजबूत करण्यास, तोंडाची दुर्गंधी दूर करण्यास आणि हिरड्यांची सूज कमी करण्यास मदत करते. हे नैसर्गिक अँटीसेप्टिक म्हणून काम करते.

तुरटी वापरण्याचे अनेक फायदे आहेत. त्याच वेळी, त्याचे काही संभाव्य दुष्परिणाम देखील आहेत. जसे की–

संवेदनशील त्वचा असलेल्या लोकांना जळजळ आणि खाज येऊ शकते. तुरटी पावडर डोळ्यांत गेल्यास जळजळ होऊ शकते. तुरटीच्या वासामुळे श्वसनाच्या समस्या उद्भवू शकतात. तुरटी गिळल्याने मळमळ, उलट्या आणि इतर पचन समस्या उद्भवू शकतात.

तुरटीच्या सुरक्षित आणि प्रभावी वापरासाठी काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. तुरटीचा दररोज वापर टाळावा. आठवड्यातून एकदा किंवा दोनदाच त्वचेवर ते वापरणे चांगले.

तुरटी त्वचेसाठी सुरक्षित आहे. हे त्वचेला घट्टपणा आणते आणि मुरुम आणि डाग कमी करते. तथापि, त्याचा जास्त वापर केल्याने चेहऱ्यावर कोरडेपणा आणि जळजळ होऊ शकते.दाढी केल्यानंतर तुरटी लावणे अगदी योग्य आहे, कारण त्यात अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. म्हणून ती उपयुक्त आहे.

# अलिबाग मतदारसंघात भाजप मजबूत; आगामी निवडणूक स्वबळावर लढणार -ॲड. आस्वाद पाटील

**अलिबाग : प्रतिनिधी**

विधानसभेच्या २०२४ साली झालेल्या निवडणुकीत अलिबाग विधानसभा मतदारसंघात आम्ही ज्यांना मदत केली त्यांच्याकडून आम्हाला जिल्हा परिषद निवडणुकीत मदतीची अपेक्षा होती. ती मदत झाली नाही. युती झाली नाही हे बरं झालं आम्हाला आमची ताकद समजली. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत अलिबाग विधानसभा मतदारसंघात भाजपला ४५ हजार मतांपेक्षा जास्त मत मिळाली आहेत. ही आमची मते आहेत. त्यामुळे २०२९मध्ये अलिबाग विधानसभा मतदरसंघाची निवडणूक भाजप स्वबळावर लढवेल असे भाजपाचे नेते ॲड. आस्वाद पाटील यांनी जाहीर केले.



अलिबाग तालुक्यातील आग्राव येथील शेकडो ग्रामस्थांनी मंगळवारी (दि. २४) भाजपामध्ये प्रवेश केला. वरसोली येथील होरायझन सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमात ॲड. आस्वाद पाटील बोलत होते. भाजपचे ज्येष्ठ नेते गिरीश तुळपुळे, मंडल अध्यक्ष रोशन भगत, भाजप दक्षिण रायगड जिल्हा महिला अध्यक्ष चित्रा पाटील, प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. मंजुषा कुर्तमूर्ती, नगरसेवक ॲड. अंकित बंगेरा, पंचायत समिती सदस्य प्रियदर्शनी पाटील, संजय पाटील, संदीप घरत, तनुजा पेरेकर, माणिक बळी, मंदा बळी, संकेत जोशी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणूकीत अलिबाग विधानसभा मतदारसंघात आमची युती झाली नाही हे चांगले झाले. आम्हाला आमची ताकद समजली. यापूर्वी भाजप या मतदारसंघात सहाव्या क्रमांकावर असायचा. आता आमची ताकद वाढली आहे. त्यामुळे २०२९च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला अलिबाग विधानसभा मतदारसंघात भाजप स्वबळावर निवडणूक लढवेल. नुसती लढवणार नाही तर आपला आमदार निवडून आणण्याचा प्रयत्न करेल, असे ॲड. आस्वाद पाटील म्हणाले.

२०२४ चया विधानसभा निवडणूकीत आम्ही ज्यांना मदत केली त्यांच्याकडून आम्हाला जिल्हा परिषद निवडणूकीत मदतीची अपेक्षा होती. ती मदत झाली नाही. आम्ही ताकद दाखवून दिली आहे. कित्येक वर्ष आम्ही ६ नंबरवर होतो आता दुसऱ्या नंबरवर आलो आहोत. रायगड जिल्हा परिषदेत भाजपचे ३ सदस्य होते त्याचे १५ झाले. भाविष्यात ३५ करू असे ॲड. पाटील म्हणाले. लवकर रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची निवडणूकी जाहीर होईल. अध्यक्ष भाजपचा होईल. तो चांगले काम करेल, असा विश्वास ॲड. आस्वाद पाटील यांनी व्यक्त केलो.

संदीप घरत म्हणाले की, भाजपची ताकद वाढवायची असेल तर काम करावे लागेल. कार्यकर्ता सक्षम करावा लागेल. युनिट तयार करावे लागेल. आग्राव ग्रामस्थांनी भाजपात प्रवेश केला आहे. लवकरच चौलमध्य देखील पक्षप्रवेशाचा कार्यक्रम होईल. या पक्षप्रवशामुळे भाजपाची ताकद वाढली आहे. त्याचा भविष्यात पक्षाला फायदा होईल, असे, ज्येष्ठ नेते गिरीश तुळपुळे म्हणाले.



**अलिबाग : राजधानी नवी दिल्लीतील एआय परिषदेत काँग्रेस कार्यकर्त्यांनी आंदोलन केले होते. त्याबद्दल भाजपच्या महिला मोर्चा दक्षिण रायगडकडून काँग्रेस पक्षाचा निषेध करण्यात आला.**


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे- नारपोली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./ हि.नं. | क्षेत्र | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ३९/२ | ०-१७-७०<br>पो. ख. ०-०२-००<br>**एकूण ०-१९-७०** | ३.३७ | साहेबराव सुखदेव खिल्लारी |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २० दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. २४/०२/२०२६**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. ता. पनवेल जि. रायगड, मो.क्र. : ९९३०३६९८६१


# घरातून रागावून गेलेली मुलगी नागोठणे पोलिसांनी शोधून दिली पालकांच्या ताब्यात



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे पोलीस ठाणे यांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे अपहरित बालिकेला अवघ्या सहा तासांत सुखरूप शोधून तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात देण्यात यश आले आहे. या उल्लेखनीय कारवाईमुळे रायगड पोलिस दलातील नागोठणे पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दि. २१फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे प्रभारी अधिकारी स.पो.नि. सचिन कुलकर्णी यांनी दोन स्वतंत्र पथके तातडीने रवाना केली.

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शोधमोहीम हाती घेण्यात आली. सुरुवातीला मुलगी सुकेळी परिसरात असल्याची माहिती मिळाली. पुढील तपासात ती ट्रकने पनवेल येथे गेल्याचे समजले. त्यानंतर मुंबईतील शिवडी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. अखेर शिवडी येथील झोपडपट्टी भागातून मुलगी सुरक्षित अवस्थेत आढळून आली.

यानंतर संबंधित मुलीला शिवडी पोलीस ठाणे येथे नेऊन जवळच्या शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली. सर्व प्रक्रिया पूर्ण करून मुलीला सुखरूप तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात देण्यात आले.प्राथमिक चौकशीत पालकांच्या रागावण्यामुळे ती रागाच्या भरात घरातून निघून गेल्याची माहिती मुलीने दिली आहे.

या संपूर्ण कारवाईत पो.उ.नि. गोटीराम पावरा, पो.हवा. चंद्रशेखर नागावकर, महिला सहाय्यक फौजदार संचिता सानप यांचेही मोलाचे योगदान लाभले. नागोठणे पोलीस ठाण्याने दाखविलेल्या वेगवान आणि समन्वयपूर्ण कारवाईचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

# खासदार तटकरे यांनी घेतली भोईर बंधूंची सांत्वनपर भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील तमनाथ येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रतिनिधी भगवान भोईर, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष वसंत भोईर आणि शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख संतोष भोईर यांच्या मातोश्री राधाबाई मारुती भोईर यांचे निधन झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी भोईर बंधुंच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेऊन सांत्वन केले.



याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, पुंडलिक पाटील, तालुकाध्यक्ष दीपक श्रीखंडे, अशोक सावंत, अशोक भोपतराव, एकनाथ धुळे, स्वप्नील पालकर आदी उपस्थित होते. तीन दिवसांपूर्वी खासदार श्रीरंग बारणे यांनी भोईर बंधुंची भेट घेऊन सांत्वन


## दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड
ईमेल आयडी - panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com

### लिलाव विक्री सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार यांनी बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून, सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन्स ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार/गहाणवटदारांना मागणी सूचना जारी करून त्यांना सदर सूचनेमध्ये उल्लेखित थकीत देय रक्कम परतावा करण्याची मागणी केली होती. तथापि, कर्जदार/गहाणवटदार, सदर देय रक्कम परतावा करण्यास अयशस्वी ठरल्याने, निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियनांच्या नियम ८ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि १४ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तांचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

| अ. क्र. | कर्जदार/ जामीनदार/ गहाणवटदाराचे नाव | मालमत्तेचे वर्णन (लिलाव करण्यात येणाऱ्या) | मागणी सूचनेचा दिनांक आणि थकबाकी रक्कम | निश्चित राखीव किंमत | राखीव किंमतीच्या १०% ईएमडी रु. | पाहणीचा दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. बाळाराम कृष्णा पाटील (कर्जदार), श्री. सुशील जगन्नाथ पाटील (जामीनदार), श्री. किरण हलधर पाटील (जामीनदार) आणि श्री. शिरीष भाऊ कडू (जामीनदार) | सदनिका क्र. बी-१०१, बी विंग, पहिला मजला, मातृ छाया कॉम्प्लेक्स सीएचएस लि. क्षेत्रफळ-११४२ चौ.फू., सीटीएस क्र. ११९१ आणि सीटीएस क्र. ११९१/१, मु. पनवेल, तालुका पनवेल, जि. रायगड. श्री. बाळाराम कृष्णा पाटील यांच्या नावे. | १५.०३.२०२४ आणि २९.०२.२०२४ रोजीनुसार रु. १८,७७,७८३/- अधिक ०१.१२.२०२० ते ३१.०५.२०२३ पर्यंतचे व्याज रु. ६,३०,९५२/- आणि दि. ०१.०३.२०२४ पासूनचे पुढील व्याज | रु. ६७.९५ लाख (ज्याखाली कोणताही प्रस्ताव स्वीकारण्यात येणार "नाही".) | रु. ६.७९ लाख | १३.०३.२०२६ आणि स. ११.०० ते दु. ०१.०० |

वरील उल्लेखित संपत्ती/मालमत्तांच्या लिलाव विक्री (सरफैसी कायदा २००२ च्या अटी आणि शर्ती आणि त्याअंतर्गत नियमनांनुसार) करिता जाहीर सूचनेच्या पुढे, दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. सदर मालमत्तांकरिता "जसे आहे जेथे आहे तत्त्वावर" आणि "जसे आहे जे आहे तत्त्वावर" फक्त लिलावाद्वारे प्रस्ताव आमंत्रित करीत आहेत.

**लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती खालील प्रमाणे आहेतः-**

१. लिलाव **'जसे आहे जेथे आहे तत्त्वावर' आणि 'जसे आहे जे आहे तत्त्वावर', 'तेथे जे आहे' आणि 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर'** आयोजित करण्यात येईल आणि "ऑफलाईन" करण्यात येईल.

२. "श्री. दिलिप बाळू खुटळे यांच्या नावे असलेला अकृषिक भुखंड, सर्व्हे क्र. ५२, हिस्सा क्र. ५, प्लॉट क्र. ६, क्षेत्रफळ ४०० चौ. मीटर्स, गाव नांदगाव, ता. पनवेल, जि. रायगड या स्थावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्ताव" असे उपरोल्लेखित केलेल्या मोहोरबंद पाकिटामधून प्रस्ताव सादर करावयास हवा आणि संभाव्य बोलीदारांनी सदर प्रस्तावाचे मोहोरबंद पाकिट खाली उल्लेखिलेल्या ठिकाणी **२२ मार्च, २०२६ रोजी सायं. ५.०० वाजता** किंवा त्यापूर्वी आणावा/पाठवावा आणि ईएमडी रक्कम दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय असलेल्या डिमाण्ड ड्राफ्टद्वारे भरावी.

३. निम्नस्वाक्षरीकारांना अशा पद्धतीने प्राप्त झालेले प्रस्ताव **दि. ३०.०३.२०२६** रोजी उपरोल्लेखित ठिकाणी स. ११.०० वाजता उघडण्यात आणि विचारात घेण्यात येतील.

४. निम्नस्वाक्षरीकार यांनी कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे आणि/लिलाव सुधारित ते रद्द करण्याचे आणि/किंवा पुढे ढकलण्याचे त्यांचे अधिकार राखून ठेवले आहेत.

५. लिलाव विक्री सरफैसी कायदा/नियमन २००२ मध्ये विहीत शर्ती आणि त्याअंतर्गत/वेबसाईटमध्ये उल्लेखित अटी आणि शर्तीच्या, तसेच इच्छुक/सहभागी होणाऱ्या बोलीदारांद्वारे सादर करावयाच्या प्रस्ताव/बोली दस्तावेजांमधील शर्तीच्या अधीन आहे.

६. उपरोल्लेखित मालमत्ता वर उल्लेखिलेल्या राखीव किंमतीच्या खाली विक्री करण्यात येणार नाहीत.

७. यशस्वी बोलीदार/रांच्या बाबतीत सदर ठेव/वी समायोजित करण्यात येतील, अन्यथा परत करण्यात येतील. सदर इसारा रक्कम अनामत/तींवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.

८. जर यशस्वी बोलीदार भरणा करण्यास अयशस्वी ठरल्यास किंवा मोहोरबंद निविदा/लिलावाच्या अटी आणि शर्तीचे पालन करण्यास कशाही प्रकारे अयशस्वी ठरल्यास, याआधीच जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि जप्त केलेल्या रकमेवर त्याचा/तिचा कोणताही दावा नसेल.

९. उपरोल्लेखित इसारा रक्कम अनामत (ईएमडी) सह प्रस्ताव मुंबई येथे देय दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय डीडी/पे ऑर्डरद्वारे दि. २० मार्च, २०२६ रोजी सायं. ०५.०० पूर्वी पॅन कार्ड आणि (आधार कार्ड) पत्त्याचा पुरावा समाविष्ट असलेल्या केवायसी दस्तऐवजांच्या स्कॅन केलेल्या प्रतींसह सेवा प्रदात्यास सादर करावी.

१०. निविदा उघडल्यानंतर, इच्छुक बोलीदार ज्यांनी राखीव किंमतीच्या खाली नसलेल्या त्यांच्या बोली सादर केल्या आहेत त्यांना प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये बोली रक्कम वाढविण्याची संधी देण्यात येईल.

११. किमान बोली विस्तार रक्कम **रु. १०,०००/- (रुपये दहा हजार)** आहे.

१२. यशस्वी बोलीदार/रांनी विक्रीच्या संदर्भात प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे प्रस्ताव स्वीकारल्यानंतर लगेचच, याआधीच भरलेली ईएमडी समायोजित करून, विक्री किंमतीच्या रकमेची २५% जमा करावी, असे न केल्यास जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. शिल्लक विक्री किंमतीच्या ७५% रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये विक्रीच्या मंजुरीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत देय आहे. जर विहीत कालावधीमध्ये शिल्लक रक्कम जमा करण्यात न आल्यास, जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल. प्राधिकृत अधिकाऱ्याने यशस्वी बोलीदारास जप्तीची पुढील सूचना देणे आवश्यक नाही.

१३. बोलीदार "कॅव्हेट एम्प्टर" (खरेदीदार सावधान) या तत्त्वाने बांधील आहेत आणि फर्म किंवा सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही भार, वैधानिक दायित्वे, मालमत्ता कराची थकबाकी, आयकर, उत्पादन शुल्क, कामगार देणी, वीज आणि देखभाल देणी इत्यादी शोधण्यासाठी त्यांची योग्य ती तपासणी करण्याचा सल्ला दिला जात आहे. यशस्वी बोलीदारांनी सर्व जावके म्हणजेच महापालिका कर, देखभाल/संस्था शुल्क, वीज शुल्क, पाणी शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क (जर लागू असल्यास), जर असल्यास आणि संबंधित मालमत्तांशी संबंधित विक्री किंमतीव्यतिरिक्त सर्व जावके समाविष्ट असलेले इतर प्रासंगिक शुल्क, खर्च भरावयाचे आहेत.

१४. यशस्वी बोलीदारांनी विक्री प्रमाणपत्रावर देय नोंदणीकरण शुल्क, मुद्रांक शुल्क, कर, तारण मालमत्ता त्याच्या/तिच्या नावे हस्तांतरित करून घेण्याकरिता कोणतेही अन्य शुल्क यांसारखे प्रभार/शुल्क भरावयाचे आहेत.

१५. विक्री प्रमाणपत्र फक्त यशस्वी बोलीदाराच्या नावेच आणि फक्त संपूर्ण/विक्री किंमत प्राप्त झाल्यानंतरच पारित करण्यात येईल.

१६. कर्जदार, गहाणवटदार आणि जामीनदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, ते लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्तीनुसार, वरील उल्लेखित मालमत्ता खरेदीकरिता इच्छुक खरेदीदार/ग्राहक सोबत आणू शकतात.

१७. वरील सदर मालमत्तांची पाहणी पूर्व परवानगीवर आधारीत आणि प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सोयीनुसार देण्यात येईल.

१८. प्राधिकृत अधिकारी उच्चतम प्रस्ताव किंवा आणि सर्व प्रस्ताव स्वीकारण्यास बांधिल नाहीत आणि कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत.

१९. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. वरील उल्लेखित मालमत्तांवर प्रलंबित असलेल्या कोणत्याही दायित्वांकरिता जबाबदार नाही. मालमत्तेचा **'जसे आहे जेथे आहे' आणि 'जसे आहे जे आहे', 'तेथे जे आहे'** आणि 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर' लिलाव करण्यात येईल.

२०. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि, कोणतेही कारण न दर्शविता किंवा पूर्व सूचनेशिवाय निविदा विक्री/लिलाव रद्द करण्याचा/स्वीकारण्याचा/फेटाळण्याचा/बदलण्याचा/सुधारणा करण्याचा/पुढे ढकलण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.

२१. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्तेवर कोणताही भार अस्तित्वात नाही. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.स विक्री अंतर्गत असलेल्या मालमत्तेच्या संदर्भातील कोणताही प्रभार, धारणाधिकार किंवा भार, मालमत्ता कर, किंवा शासन किंवा अन्य कोणाचीही अन्य कोणतीही देणी याकरिता जबाबदार धरता येणार नाही.

२२. विक्री दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.च्या मंजुरीच्या अधीन आहे.

**ठिकाणः पनवेल, जि. रायगड**
**दिनांकः २३.०२.२०२६**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**



## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

### जाहिरात

### समाज विकास विभाग

पनवेल महानगरपालिका क्षेत्रालगतच नव्याने उभारण्यात आलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यात आले आहे. या विमान तळामुळे पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील युवक-युवतींना नोकरीच्या व रोजगाराच्या व्यापक संधी उपलब्ध होणार आहेत. या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक युवक-युवतींना विमानतळाशी संबंधीत अद्यावत व कौशल्य पूर्वक प्रशिक्षण मोफत दिल्यास स्थानिक युवक व युवतींना अधिका अधिक नोकरीच्या व रोजगाराच्या संधी मिळू शकतील. त्या अनुषंगाने सदर (EOI) स्वारस्याची अभिव्यक्ती पनवेल महानगरपालिका www. panvelcorporation@gmail. com या वेबसाईट अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच महा-ई-टेंडर वरती सदरचा EOI दिनांक. २५/०२/२०२६ ते ०५/०३/२०२६ पर्यत असणार आहे.

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./ ३१२६/प्र.क्र. ४१/४७/२०२६**
**दिनांक :- २४/०२/२०२ ६**

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त II**
**समाज विकास विभाग**
**पनवेल महानगरपालिका**



## कागदपत्रे हरविलेबाबत

मी,श्री. जितेंद्र नामदेव घरत , वय ४७ वर्षे, पत्ता : रा. ४४७, राम मंदिर जवळ, चिरले, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६

माझेकडून पनवेल परिसरात दि. १४/०२/२०२६ रोजी १४.०० वा चे सुमारास प्रवास करित असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. ०३२६/२०२६ दिनांक. १६/०२/२०२६ रोजी नोंद त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. रुम नं ए २०३, २ रा माळा, बि.नं १२ ए विंग रॉयल ओझोन को. ऑप. हौ. सोसा, शिरढोण, पनवेल या ओरीजनल कागदपत्र नोंदणीकृत दस्त हा पवल १ मध्ये दस्त नं ५३७१/२०१९ दिनांक. ०३/०६/२०१९

**दिनांक :- २४/०२/२०२६**

**सही/-**
**जितेंद्र नामदेव घरत**
**मो. ९३७०१०००००**



## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**
**सभा सूचना क्रमांक ०२, दिनांक ०६/०३/२०२६**

प्रति,
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.
महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक ०६/०३/२०२६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक ०२. दिनांक ०६/०३/२०२६ ची**
**विषयपत्रिका**
**विषय**

**विषय क्रमांक**

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० स्थायी समितीची रचना यामधील पोटकलम (१) व (२) अन्वये, माहे जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या प्रभागांच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या पालिका सदस्यांपैकी १६ व्यक्तींची स्थायी समिती सदस्य पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ अ अन्वये प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नियुक्ती करणे.

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० पोटकलम (१) अन्वये, महापालिकेने सदर अधिनियमासोबतच्या अनुसूची प्रकरण २ मधील नियम ४ (अ), महिला व बालकल्याण समितीची सदस्य संख्या निश्चित करणे आणि नियम ४ (ब) नुसार या समितीवर महापालिकेने पालिका सदस्यांपैकी निश्चित केलेल्या सदस्यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ (अ) अन्वये प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नियुक्ती करणे.

३. महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्या) नियम २०१२ अन्वये व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ (अ) अन्वये, प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन ७ नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणे.

तरी, सदर सभेस कृपया उपस्थित रहावे, ही विनंती.
**(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)**

**जा.क्र.:-पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र. ०२/०१/२०२६**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**दिनांक :- २४/०२/२०२६**

**सही/-**
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**



## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे- मोर्बे, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन -**
**मौजेः मोर्बे, तालुका- पनवेल, जिल्हा- रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर. पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मोर्बे | १ सुरेश जगनारायण सिंह<br>२. राकेश जगनारायण सिंह<br>३ महेश जगनारायण सिंह<br>रा. सर्व मोर्बे, ता. पनवेल, जि. रायगड | ५२/८ | ०.६८.७०<br>०.२.४०<br>०.७१.१०<br>पैकी<br>३५.५५<br>हे. आर. पॉ. | १४.१२<br>पैंकी<br>७.३१ |
| | | एकुण | ३५.५५ | |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २३/०२/२०२६**

**सही/-**
**ॲड. सरिता महेंन्द्र साखरे**
**पत्ता- प्लॉट नं.३०, सेक्टर १/२, रोड नं. ४ नविन पनवेल, बालाजी मंदिरच्या समोर ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.**

## नवी मुंबईत महानगरपालिका हद्दीत

# कर थकबाकीदारांच्या संख्येत वाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील श्रीमंत महापालिकांमध्ये गणल्या जाणाऱ्या नवी मुंबई महापालिकेच्या मालमत्ता कर थकबाकीदारांची संख्या दिवसागणिक वाढू लागली आहे. शहरात एकूण तीन लाख ५८ हजार मालमत्ताधारक आहेत. त्यापैकी एक लाख ७२ हजार म्हणजे निम्म्याहून अधिक मालमत्ताधारकांनी महापालिकेचा मालमत्ता कर भरला नसल्याची धक्कादायक माहिती आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्वसाधारण सभेत दिली. महापालिका प्रशासनाने यंदाच्या वर्षात एक हजार कोटी रुपये इतके मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट ठेवले आहे.

महापालिका निवडणुकांनंतर पार पडलेल्या नवी मुंबई महापालिकेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत महापालिका आयुक्तांनी ही माहिती दिली. या परिस्थितीचा थेट परिणाम महापालिकेच्या महसुलावर



**एकूण मालमत्ताधारक** – तीन लाख ५८ हजार

**थकबाकीदार** – एक लाख ७२ हजार

**करवसुलीचे उद्दिष्ट** – एक हजार कोटी रुपये

आणि परिणामी नागरी सुविधा व विकासकामांवर होत असल्याचे आयुक्तांनी म्हटले. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरात एकूण ३ लाख ५८ हजार मालमत्ताधारक असून त्यापैकी तब्बल एक लाख ७२ हजार मालमत्ताधारकांनी वर्षोनवर्षे मालमत्ता कर भरलेला नाही. सर्वसाधारण सभेत मांडण्यात आलेल्या कर दर निश्चितीच्या ठरावावर चर्चा करताना त्यांनी ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. इतक्या मोठ्या प्रमाणावर थकबाकी राहणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, सत्तास्थापनावेळी मालमत्ता करात वाढ होऊ देणार नसल्याची भूमिका भाजपने जाहीर केली होती. त्यानुसार पहिल्याच महासभेत करवाढ न करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. गेल्या २० वर्षांत मालमत्ता करात वाढ करण्यात आलेली नाही, परंतु इतर महापालिकांच्या तुलनेत नवी मुंबईत कराचे दर कमी असतानाही मोठ्या प्रमाणावर थकबाकी राहणे हे महापलिकेच्या प्रतिमेला भूषणावह नसल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

वारंवार नोटिसा देऊनही कर न भरणाऱ्या मालमत्ताधारकांवर इच्छा नसतानाही कारवाई करावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळेच निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी महापालिकेला कर वसुलीत सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्तांनी सभागृहात केले. महसूलात वाढ झाल्यास वाढीव विकास निधीच्या माध्यमातून नगरसेवकांनाच याचा फायदा मिळेल, असे आयुक्तांनी सभागृहात सुचवले.

मालमत्ता कर हे महापालिकेचे प्रमुख उत्पन्नाचे साधन आहे. पाणीपुरवठा, रस्ते, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य सेवा आणि प्रशासकीय खर्च यासाठी या उत्पन्नावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते.

### नागरिकांना पालिका आयुक्तांकडून इशारा

२०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी १२०० कोटी रुपयांचे करसंकलनाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, मात्र अपेक्षित वसुली होत नसल्याने प्रशासनाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. उद्दिष्टपूर्तीसाठी कठोर भूमिका घेतली जाईल आणि उद्दिष्टपूर्ती न झाल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही आयुक्तांनी दिला आहे.

# प्रभाग १९मध्ये गटारांची दुतर्फा नव्याने बांधणी करण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका प्रभाग क्र.१९ मधील विविध ठिकाणच्या गटारांची दुतर्फा नव्याने बांधणी करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका दर्शना भोईर यांनी मनपा आयुक्तांकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापौर नितीन पाटील यांच्याकडे निवेदनाची प्रत दिली.



नगरसेविका भोईर यांनी मनपा आयुक्तांच्या नावे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पनवेल महानगरपालिका हद्दीतील लाईन आळी, मिरची गल्ली, वाणी आळी, वरची आळी, प्रभु आळी, कोळीवाडा या भागांमधील गटारे पुर्वाश्रमीच्या नगर परिषद कालावधीतील आहेत. सध्या गटारे पूर्णपणे भरून वाहतात त्यामधून मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरते व सदरील पाणी रस्त्यावरून चाहत पुर्णपणे विदुप अवस्था होते. व सध्या पनवेल महानगरपालिका क्षेत्रालगत असलेल्या जेएनपीटी बंदर, अटल सेतू, लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ यामुळे प्रभाग क्र.१९ व इतर परिसरामध्ये अनेक नागरिक बास्तव्याकरीता प्राधान्य देत आहेत. त्यामुळे या परिसरामध्ये लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने इमारतीची प्रमाणावर वाढत आहेत. इमारतीच्या मलनिस्सारणाच्या पाण्याचा निचरा व्यवस्थीतरित्या व्हावा या करीता उक्त उल्लेखीत परिसरामध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजुला गटारांची पूर्नबांधणी होणे आवश्यक आहे.

पनवेल महानगरपालिका प्रभाग क्र. १९ मधील उक्त उल्लेखीत भागांतील गटारांची दोन्ही बाजुने दूतको पुर्नबांधणी करण्याबाबतचा विषय महानगरपालिकेच्या अगामी होणाऱ्या महासभेमध्ये घेऊन त्यावर कार्यवाही करण्यात यावी, असेही निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

# नवीन पनवेलच्या विसपुते कॉलेजमध्ये राज्यस्तरीय संशोधन कार्यशाळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री.बापूसाहेब डीडी विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेल येथे एमएड व बीएडच्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधनविषयक कौशल्य विकसित व्हावे तसेच त्यांच्यात संशोधनात्मक दृष्टीकोन निर्माण व्हावा या उद्देशाने एकदिवसीय राज्यस्तरीय संशोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२२) झाली.

कार्यक्रमाची सुरुवात भारतातील पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणातून कार्यशाळेच्या आयोजनामागील उद्दिष्ट स्पष्ट केले व शिक्षक शिक्षणामध्ये संशोधनाचे महत्त्व अधोरेखित केले.

चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच मुंबई विद्यापीठाचे आंतरविद्याशाखेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चंद्रशेखर चक्रदेव यांनी शैक्षणिक संशोधनाच्या संकल्पना व कार्यपद्धती यांवर प्रात्यक्षिके आणि चर्चेद्वारे सखोल मार्गदर्शन केले. प्रा. विभावरी शिगवण व ग्रंथपाल डॉ. सुवर्णा परब यांनी संशोधनासाठी उपयुक्त असलेल्या विविध संकेतस्थळे व संदर्भसाहित्य यांविषयी मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेस मुंबई तसेच महाराष्ट्रातील विविध भागांतून १०० हून अधिक विद्यार्थी व संशोधकांनी सहभाग नोंदविला. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी उपप्राचार्य डॉ. विनायक लोहार, IQAC समन्वयक डॉ.प्रितेश वाढे, डॉ. नेहा म्हात्रे, प्रा. निलेश अडसुळे, प्रा. राजू गायकवाड, प्रा. सुषमा संकपाळ, ग्रंथपाल प्रिया सगरे, शिवांजली पांढरपट्टे, योगेश ठोकळ, महेश जाधव व सुनील निकम यांनी मोलाचे योगदान दिले. डॉ. प्रितेश वाढे यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली.

या यशस्वी उपक्रमाबद्दल आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन धनराज विसपुते व संचालिका संगीता विसपुते यांनी महाविद्यालयाचे विशेष कौतुक केले. संशोधनाची आवड जागवणारी व शैक्षणिक गुणवत्तेला नवी दिशा देणारी ही कार्यशाळा सर्वांच्या स्मरणात राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# नवीन पोसरी येथे महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

हुमाना पीपल टू पीपल इंडिया आणि मर्क स्पेशालिटीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा नवीन पोसरीतील हनुमान मंदिराच्या सभागृहात परिसरात भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती आणि तपासणीसाठी राबवण्यात आलेल्या या आरोग्य शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. या शिबिरात रक्तदाब, मधुमेह,स्तन तपासणी, सिकलसेल तपासणी तसेच गर्भाशय मुखाचा कर्करोग याची तपासणी करण्यात आली तसेच तज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन देण्यात आले.

या उपक्रमात डॉ. तृप्ती पोयरेकर (स्त्री रोग तज्ञ व प्रसुती तज्ञ ) आणि डॉ. प्राची जोशी (स्त्री रोग तज्ञ व प्रसुतीतज्ञ) यांनी सविस्तर तपासणी करून योग्य वैद्यकीय सल्ला दिला. प्रोजेक्ट लीडर पिंटू कुमार शर्मा, हेल्थ एक्सिलेटर मनीषा गणेश खंडागळे, कम्युनिटी मोबिलायझर तनिष्का तुळशीदास कर्णेकर आणि एमआयएस ऑपरेटर अर्णव गांगुली, हुमानाचे माजी कर्मचारी प्रवीण पवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

यावेळी ग्रुप ग्रामपंचायत वासांबे सरपंच उमाताई मुंढे, संदीप मुंढे, ग्रामपंचायत सदस्य रसिका राकेश खराडे, सदस्या प्रतीक्षा राऊत, सदस्या वेदिका पाटील, सदस्या मयुरा गोपाळे, वर्षा पाटील, सारिका कांबळे, उज्वला शेंडकर, मयुरी गोपाळे, नीलिमा पाटील, सुनिता पाटील, सुप्रिया खारकर, पूर्वा खाने व ममता काळोखे, प्रियंका तेलंगे, राजेश जगताप आदी उपस्थित होते.

हुमाना पीपल टू पीपल इंडिया आणि मर्क स्पेशालिटीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्या विद्यमाने गेल्या दीड वर्षापासून आरोग्य जनजागृतीचे उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. प्रकल्प निरामया मुंबई पाताळगंगा अंतर्गत महिलांचे व किशोरवयीन मुलींचे आरोग्य गट तयार करून दरमहा प्रशिक्षण, गृहभेटी, जनजागृती रॅली, मोफत सॅनिटरी पॅड वाटप करणे, शाळा कॉलेजमध्ये मुलींसाठी आरोग्य प्रशिक्षण सत्र घेणे, असे उपक्रम राबविले जात आहेत.

या शिबिरामुळे आरोग्याबाबत जागरूकता असले पाहिजे व भविष्यातही अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# विठ्ठल-रखुमाईचा उरण शहरात गजर



**उरण : वार्ताहर**

उरण शहरातील आनंद नगर येथील श्री क्षेत्र विठ्ठल रखुमाई मंदिराचा २५वा वर्धापन दिन विठ्ठलभक्त हभप लक्ष्मन गजानन पाटील, विठ्ठलभक्त हभप भरत गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि. २२) कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

या दिवशी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत, काकड आरती, अभिषेक ज्ञानेश्वरी पारायण वाचन, पुष्पांजली कीर्तन, महाप्रसाद, भजन ४ ते ६ वाजेपर्यंत पालखी मिरवणूक काढण्यात आली.

उरण शहरात पालखी मिरवणूक काढण्यात आली. पालखी सुरुवात आनंद नगर, कामठा रोड, बाजारपेठ, राघोबा देव मंदिर परत आनंद नगर येथे सांगता समारोप करण्यात आला. विठ्ठल मंदिराचे संत मेळा कीर्तनकार गोविंद घरत कमलाकर केशव म्हात्रे, जयवंत पाटील, रमेश सोंडकर, अनिल महाराज, मंगेश भरत पाटील व सेवेकरी यांचे सहकार्य मिळाले.



**पनवेल : भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जाती मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ललिता इनकर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी अनुसूचित जाती मोर्चाचे कामोठे अध्यक्ष मयूर मोहिते उपस्थित होते.**

# युईएस संस्थेतर्फे दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

अभ्यासाच्या, परीक्षेच्या ओझ्याने दबलेल्या विद्यार्थ्यांच्या मनावरील भार कमी करण्यासाठी व परिक्षेची भिती दूर करुन मनात आत्मविश्वासाचं सुगंध भरुन, हसतमुख चेहऱ्याने मुक्तपणे परिक्षेला सामोरे जाण्याच्या हेतुने युईएस संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, खजिनदार अॅड. अपूर्वा ठाकूर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, समन्वयक, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका व शिक्षकांच्या हस्ते प्रत्येक विद्यार्थ्याला गुलाबाचे फूल देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.



युईएस स्कूल व संस्थेतर्फे १० वीच्या परिक्षेला बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांला देण्यात येणाऱ्या गुलाबाच्या फुलामुळे, विदयार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा ताण कमी होऊन टवटवीतपणा दिसत होता. ज्यामुळे सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालकांचे चेहरे प्रफुल्लीत झाले होते व सर्वत्र सकारात्मक उर्जेचा प्रवाह सळसळत होता.

यंदा युईएस स्कूल अॅण्ड कॉलेजमध्ये २० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या परिक्षेसाठी एकूण ६ ब्लॉकमध्ये मराठी मिडीयम शाळेतील १०० तर उर्दू मिडीयम शाळेतील ३० असे एकूण १३० विदयार्थी परिक्षा देण्यासाठी आले होते.

२३ फेब्रुवारी २०२६ रोजी एकूण १५ ब्लॉकमध्ये उरण मधील युईएस इंग्लिश मिडीयम स्कूल उरण, जी. ई. आय इंग्लिश मिडीयम स्कूल उरण, रोटरी इंग्लिश मिडीयम स्कूल उरण, सेंटमेरी हायस्कूल उरण, द्रोणागिरी इंग्लिश व मराठी मिडीयम हायस्कूल करंजा, सिटीझन हायस्कूल उरण, सेंटमेरी स्कूल जेएनपी, न्यु. इंग्लिश स्कूल मोरा, इक्रा इंग्लिश मिडीयम स्कूल उरण, असे इंग्लिश मिडीयम शाळेतील ३२३ तर उर्दू मिडीयम शाळेतील ३० असे एकूण ३५३ विद्यार्थी परिक्षा देत आहेत.

# उरणच्या बाजारात गारेगार, रसाळ कलिंगड

**उरण : बातमीदार**

सध्या सर्वत्र कडक उन्हाळा आहे. उन्हाचा पारा दिवसेन दिवस वाढत असल्याने शीत पेयांबरोबरच थंड असलेल्या कलिंगडाला मोठ्या प्रमाणात मागणी वाढली असून उरण बाझारपेठेत कलिंगडची मोठ्या प्रमाणात विक्री होताना दिसून येत आहे.

अलिकडच्या काळात विविध संकरीत जातींचे वाण विकसित झाल्यामुळे पावसाळ्यात लावलेले विविध जातीचे कलिंगड ऑक्टोबर ते जानेवारी महिन्यापर्यत उरण



मध्ये विक्रीसाठी ठेवण्यात येते. मात्र हा मोसम हिवाळ्यात असल्यामुळे कलिंगडाची फारशी विक्री होतेच असे नाही, परंतू महाशिवरात्रीनंतर खऱ्या अर्थाने न उन्हाळा जाणवायला लागतो. आणि त्याचदरम्यान कलिंगडे बाजारात येतात.

यावेळी उन्हाच्या वेदना उशीरा जाणवू लागल्या आहेत. होळी नंतर खऱ्या अर्थाने उन्हाचे चटके बसायला सुरूवात होते. गेल्या आठवड्यापासून उरण मधील विविध स्टॉलवर मोठ्या प्रमाणात गर्दी निदर्शनास येऊ लागली. काळे आणि पट्टे असलेले कलिंगड विक्रीकरीता उरण मध्ये विविध ठिकाणी ठेवण्यात आले आहे. ८० रू पासून दोनशे रूपयांपर्यंत नग विकले जात असल्याचे उरण मधील विक्रेत्यांनी सांगितले.

दिवसभरात २०० ते ३०० नगाची विक्री होत असून सुट्टीच्या दिवशी हा आकडा ४०० पर्यंत जातो अशी माहितीही त्यांनी दिली. एप्रिल आणि मे महिन्यात पारा आनखी चढणार आहे. त्यामुळे कलिंगड फळाला ग्राहकांची पसंती वाढली असून कलिंगडला सध्या अच्छे दिन आले आहेत.



**मुंबई : भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी प्रदेश कार्यकारिणीची घोषणा केली. या कार्यकारिणीत अनेक नव्या चेहऱ्यांना राज्य पातळीवर काम करण्याची संधी देण्यात आली आहे. कार्यकारिणीत आमदार निरंजन डावखरे यांची सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल डावखरे यांनी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची सदिच्छा भेट घेऊन आभार व्यक्त केले, तर प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी खासदार धैर्यशील पाटील, नवनियुक्त प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आदी उपस्थित होते.**

# चौल मुखरी मंदिरासमोरील मोरी बांधकामास विलंब

## ■ वाहतूक कोंडीने प्रवासी आणि वाहनचालक हैराण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

एक महिना उलटला तरी अदयापी चौल मुखरी मंदिर समोरील मुख्यः रस्तातील नुतन मोरी बांधकामाचे पुर्तता न होता मोरी बांधकाम कामास विलंब होत आहे, परिणाम येथून वाहतुक कोंडी समस्येला सामोरे जावे लागते.

रेवदंडा-अलिबाग या महत्वपुर्ण रस्तावर असलेल्या चौल येथून मिनिटागणीत वाहतुकीची रेलचेल असते, अलिबाग-रेवदंडा मुख्यः रस्ताचे नव्याने नुतनीकरणाचे काम सुरू आहे. या कामासाठी चौल मध्ये मुखरी गणपती मंदिर नजीक असलेली मोरी सुध्दा नव्याने बांधण्यात येत आहे, परंतू हे मोरी बांधकाम एक महिना उलटून गेला तरी संबधीत ठेकेदारांनी या कामाची अद्यापही पुर्तता केली नाही आहे. परिणामी या बांधकामास फारच विलंब होत असल्याने प्रवासीवर्ग संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत.



या नव्याने मोरी बांधकामाचे काम गेले महिनाभर सुरू आहे, त्यामुळे येथून एकमार्गी रस्ता ठेवण्यात आला आहे. शिवाय येथे गाडया पास होत असताना वाहतुक नियत्रंक दिसून येत नाही. या रस्ताने मिनिटागणीत वाहतुक सुरू असल्याने येथे वाहतुक कोंडी निर्माण होते. गेले महिनाभर प्रवासीवर्ग तसेच वाहन चालकांना हा त्रास सहन करावा लागतो आहे.

चौल मुखरी गणपती नजीकच्या मोरी बांधकाम संबधीत ठेकेदाराने महिना उलटून गेला तरी पुर्ण न केल्याने प्रवासीवर्ग तसेच वाहन चालक यांनी संप्तत पतिक्रिया व्यक्त करत आहेत. या नुतन मोरी बांधकामाची पुर्तता केव्हा होईल व येथून होत असलेली वाहतुक कोंडी केव्हा संपेल, असा प्रश्न प्रवासीवर्ग व वाहन चालक विचारीत आहेत. या रस्तात पुढे अलिबागकडे जाताना चौलमध्ये दोन मोरी बांधकाम सुरू आहेत, ही कामेसुध्दा विलंबाने केली जात आहेत.

मुख्य रस्ताला असलेले नुतन मोरी बांधकाम तत्परतेने पुर्तता होणे गरजेचे आहे, मात्र संबधित ठेकेदार कामास गती देत नसल्याचा आरोप केला जात असून संबधीत खात्याने ठेकेदारास समज दयावी, अन्यथा ठेकेदार बदलून लवकरात लवकर काम पुर्ण करण्यात यावे, अशी मागणी प्रवासीवर्ग तसेच वाहन चालक करत आहेत.

## चांदेवाडी येथे १३० लाभार्थी कुटुंबांना ब्लँकेटचे वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

विष्णुदास बुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्र यांच्या पुढाकाराने आशाएँ चॅरिटेबल ट्रस्ट, नाकोडा दरबार (मंडळ) लालबाग, वर्धमान संस्कृती सेवाधाम, कोलाबा रोटी बँक,कोलाबा चौविहार हाऊस तसेच श्री पार्श्व वनेजियन मानव सेवा समूह यांच्या संयुक्त विद्यमाने चांदेवाडी येथे गरजू व गरिब कुटुंबांना ब्लँकेट वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत एकूण १३० लाभार्थी कुटुंबांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. विष्णुदास बुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्र यांच्या पुढाकारामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या झाला.

संस्थेचे पदाधिकारी गोखले दाम्पत्य,स्वयंसेवक तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## विघवली येथे धन निरंकार स्वच्छता अभियान

**माणगाव : प्रतिनिधी**



तालुक्यातील विघवली येथे रविवारी (दि.२२) धन निरंकार संस्थेच्या सेवाभावी सदस्य व पदाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले. कडापे व खरवली शाखेच्या माध्यमातून आयोजित या अभियानात अपर्णेश्वर मंदिर व तलाव परिसराची स्वच्छता करण्यात आली. शेवाळ, पालापाचोळा व कचरा बाहेर काढून परिसर स्वच्छ करण्यात आला. या उपक्रमातून जल स्वच्छ, मन स्वच्छ हा संदेश देण्यात आला.

अभियानाच्या उद्‌घाटनावेळी सुधाकर साबळे (कडापे) व शंकर सारंगे (खरवली) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. यावेळी व्यासपीठावर गावचे सरपंच वैष्णव साठे, ग्रामसमिती अध्यक्ष सुधीर सापळे, ज्येष्ठ नागरिक अनंत गो. साठे, वसंत साठे, अनिल साठे, सुशांत कोदे व पोलीस पाटील आदी उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमास शुभेच्छा देऊन आयोजकांचे स्वागत केले.

महिला प्रतिनिधी सपना सारंगे, लता सुर्वे व स्नेहा सालदूर यांनी नियोजनात सक्रिय सहभाग घेतला. तसेच आश्विनी सालदूर व अरविंद सालदूर यांनी भोजनाची पूर्वतयारी केली असल्याची माहिती भाऊ देवू सापळे यांनी दिली. महेंद्र सापळे, गणेश सापळे आदी ग्रामस्थांनी उपस्थित पाहुण्यांना अल्पोपहाराची सेवा दिली. ज्येष्ठ सदस्या इंदुताई कानडे व जगन दादा कानडे यांनीही उपस्थित राहून समाधान व्यक्त केले. सन २०१२ मध्ये धन्यनिरंकारचे बाबा हरजित सिंह महाराज यांच्या कृपेने गावात असेच स्वच्छता अभियान राबविण्यात आले होते, अशी आठवण अरविंद सालदूर यांनी यावेळी सांगितली. सकाळी ७.३० वाजता गावातून शोभायात्रा काढण्यात आली. नियोजित वेळेत कार्यक्रम सुरू करून वेळेचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या नथुराम मुंढे व सदस्यांच्या शिस्तबद्ध कार्यपद्धतीचे ग्रामस्थांनी कौतुक केले.

कार्यक्रमादरम्यान शंकर सारंगे यांचा चंदन देऊन गणेश जंगम यांनी सत्कार केला. तसेच धन्यनिरंकार संस्थेचा दर सोमवारी विघवली येथे सत्संग होत असून त्यातून समाजात चांगले संस्कार घडत असल्याची माहिती बेरडे यांनी दिली.

## जनता विद्यालयात 'हिंद-दी-चादर'चा जयघोष

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

हिंदुस्थानी संस्कृती आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे श्री गुरु तेग बहादूर जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम निमित्ताने खालापूर तालुक्यातील खोपोली येथील जनता विद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकाच वेळी सुप्रसिद्ध गायक सरताज सिंग यांनी गायलेले 'हिंद-दी-चादर' हे गीत सादर केले.



या ऐतिहासिक उपक्रमाची दखल 'बेस्ट ऑफ इंडिया' रेकॉर्डने घेतली असून, अप्पर आयुक्त वैशाली इंदानी यांनी आगामी २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी खारघर येथे होणाऱ्या भव्य सोहळ्यास सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे भावनिक आवाहन केले आहे.

यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ललिता दहीतुले, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारुद्र नाळे, उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे गटशिक्षणाधिकारी दीपा परब, खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव किशोर पाटील, विद्यालयाचे प्राचार्य कानिफनाथ गोरे आदी उपस्थित होते.

अप्पर आयुक्त वैशाली इंदानी म्हणाल्या की, श्री गुरु तेग बहादूर सिंग जी यांचे बलिदान केवळ शीख समाजासाठी नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून खारघर, सेक्टर २९ येथे आयोजित होणाऱ्या या भव्य समागमात जगभरातून १५ ते २० लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. अशा विश्वविक्रमी उपक्रमात सहभागी होण्याचे भाग्य लाभल्याचे मनस्वी समाधान मिळाले असल्याचे त्यांनी नमूद केले.

श्री गुरु तेग बहादूरजी यांचे जीवन धैर्य, करुणा, समता आणि अन्यायाविरुद्ध निर्भयपणे उभे राहण्याचा एक तेजस्वी आदर्श आहे. विद्यार्थ्यांनी एकाच सुरात गायलेले हे गीत सामाजिक बांधिलको अधिक घट्ट करणारे असून, जागतिक स्तरावर याची नोंद होणे ही गौरवास्पद बाब आहे. भविष्य या मुलांच्या हातात असून त्यांना असे संस्कारक्षम कार्यक्रम निश्चितच मार्गदर्शक ठरतील त्यात शंका नाही, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेली ही मोहीम आता केवळ 'व्हिडिओ कंटेंट' न राहता एक संस्कारांची डिजिटल चळवळ बनली आहे. गुरुबचन सिंह यांनी गुरु तेग बहादूर यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकत मुलांचे प्रबोधन केले.

## अलिबाग येथील विज्ञान प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन आणि जिज्ञासू वृत्ती यांना चालना मिळावी या उद्देशाने अलिबाग येथे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात तालुक्यातील ५० हून अधिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

अलिबाग येथील उर्दू शाळेत भरलेल्या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून साकारलेल्या विविध विज्ञानाधारित प्रतिकृती, मॉडेल्स आणि प्रयोग सादर केले.

विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेला वाव देत विज्ञानाविषयी आवड निर्माण करणे हा प्रदर्शनामागील मुख्य हेतू होता. शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करत अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे मत व्यक्त केले. अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन, एडलगिव्ह फाउंडेशन, रायगड जिल्हा परिषद आणि अलिबाग नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.



## नागोठण्यातील अखंड नामयज्ञ सोहळ्याची उत्साहपूर्ण सांगता

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणात सालाबादप्रमाणे शुक्रवार, २० फेब्रुवारी ते सोमवार २३ फेब्रुवारी दरम्यान अखंड नामयज्ञ सोहळा अत्यंत भक्तीमय व उत्साही वातावरणात झाला.

स्वा. सु. नि. गुरुवर्य गणपतबाबा अलिबागकर महाराज, स्वा. सु. नि. गुरुवर्य गोपाळ महाराज वाजे, स्वा. सु. नि. गुरुवर्य धोंडू महाराज कोल्हटकर, स्वा. सु. नि. गुरुवर्य तुकाराम महाराज पतारे यांच्या कृपाशीर्वादाने तसेच पंढरपूर मठ मठाधिपती स्वा. सु. नि. नारायणदादा वाजे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथराज ज्ञानेश्वरी चे सामुदायिक पारायण पार पडले.



सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी पहाटे ४ ते ६ या वेळेत काकड आरती, सकाळी ११ ते १२ दरम्यान काल्याचे कीर्तन झाले. त्यानंतर माऊलींच्या पालखी सोहळ्यास प्रारंभ झाला. पालखी नागोठणे शहरातून भक्तीभावाने फिरविण्यात आली. मोठ्या संख्येने भाविकांनी पालखीचे दर्शन घेत जयघोषात सहभाग नोंदविला.

पालखी सोहळ्यादरम्यान श्री जोगेश्वरी माता मंदिर विश्वस्त कमिटीचे सचिव भाईसाहेब टके व इतर ग्रामस्थांनी दर्शनाचा लाभ घेतला. संत सेवा मंडळ ज्ञानेश्वर मंदिर, नागोठणे चे संस्थापक वै. हभप सिताराम बापूजी रावकर उर्फ आण्णा यांच्या प्रेरणेने आयोजित या अखंड नामयज्ञ सोहळ्यास नागोठणे पंचक्रोशीतील असंख्य भाविकांनी हजेरी लावली. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी योगदान देणाऱ्या हभप व्यक्ती व ग्रामस्थांचा संत सेवा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## खारगल्ली येथे विनामूल्य चष्मे वाटप व नेत्र तपासणी शिबिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा या सेवा भावनेतून अलिबाग-रेवदंडा मुख्य रस्तालगत खारगल्ली-साईनगर धोबनतळ्याचे समोरील प्रशांती निवासमध्ये सलग चौथ्यांदा मासिक विनामूल्य चष्मे वाटप व नेत्र शिबीर सोमवारी (दि.२३) सकाळी ९ ते दुपारी २ वाजण्याच्या दरम्यान झाले.

श्री सत्य साई सेवक सुरेश मेहरे निवासस्थानी प्रशांती निवासमध्ये श्री साई नेत्रालय या ओ. पि.डी.युनिटच्या माध्यमातून मोफत नेत्र संबधीत सर्व उपचार, तसेच मोती बिंदू/काच बिंदूचे मोफत ऑपरेशनसुध्दा कसलेही शुल्क न आकारता प्रत्येक महिन्यातील २३ तारखेला करण्यात येत आहे. या नेत्र शिबिराचा लाभ सकाळी नऊ ते दुपारी दोन वाजेपर्यंत मोठया संख्येने गरजूनी घेतला. यावेळी एकूण ४० जणांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

या नेत्र शिबिरास श्री सत्यसाई सेवक सुरेश मेहरे यांचे प्रमुख उपस्थितीसह पुणे येथील सतिश कोटा, तसेच स्थानिक शिवराम पटेल, नरेशभाई पटेल, सुरेश खडपे, प्रकाश पाटील, देवानंद हाले, विकास हाले, अनिल चौलकर, अर्चना पारखी, जागृती हाले, तसेच डॉ. हेत मामानिया एम.एस. ऑप्टोनी निलेश म्हात्रे, लॅब दिपेश पाटील, सिस्टर श्रध्दा म्हात्रे, वाहलन चालक किरण नरनन आदींनी विशेष परिश्रम घेतले.

गरजूनी अधिक माहितीसाठी ९८५०२१७६४८, ७०२०७७२७६४, ७७४१०९३०५९, ९०७५५२३५३७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सत्यसाई सेवक सुरेश मेहरे यांनी कळविले आहे.



## नॉर्वेतील आयबी, सीएफआय संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची पेणमधील युनिटला भेट

**पेण : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही Indias Barn (IB) संस्थेच्या नॉर्वेतील चेअरपर्सन श्रीमती हेगे यांनी काही स्पॉन्सर्स व डायरेक्टर्स यांच्या समवेत Children's Future India, (CFI) रायगड युनिट, पेण येथील कार्यालयास भेट दिली.



या भेटीदरम्यान त्यांनी CFI कार्यालयात कर्मचारीवृंदांसोबत प्रतिपालित मुलांचा प्रकल्प तसेच इतर प्रायोजित उपक्रमांविषयी सविस्तर चर्चा केली व CFI करत असलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या भेटीत त्यांनी विविध गावांना भेट देत सुमारे ५० प्रतिपालित मुलांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधला व मुलांच्या शिक्षण व प्रगतीची विचारपूस केली. भेटीदरम्यान नॉर्वेतून आणलेल्या भेटवस्तूंचे वितरण मुलांना करण्यात आले. त्याचप्रमाणे मुलांनी आपल्या हस्तकलेतून तयार केलेल्या शोभेच्या वस्तू नॉर्वेजियन पाहुण्यांना भेट म्हणून देऊन कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमास डॉ. किशोर देशमुख (संस्थेचे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी) यांचे मार्गदर्शक व यजमान म्हणून मोलाचे सहकार्य लाभले. डायरेक्टर्स व नॉर्वेतील स्पॉन्सर्स यांनी मुलांशी व ग्रामस्थांशी संवाद साधताना आनंद व्यक्त केला व या भेटीमुळे संस्थेच्या कार्याचा जवळून अनुभव घेता आल्याचे सांगितले.

## माझी वसुंधरा अभियानात कोकण विभागात तुपगाव ग्रामपंचायत प्रथम

**चौक : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियानात ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव यांनी उत्कृष्ठ कामगिरी केल्याने कोकण विभागात त्यांचा प्रथम क्रमांक तर राज्यात अकरावा क्रमांक आल्याने गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत तुपगाव सरपंच रवींद्र कुंभार वी ग्राम पंचायत अधिकारी विश्वास वारे यांनी माझी वसुंधरा अभियान ५.० हा कोकण विभाग स्तरीय प्रथम क्रमांक पुरस्कार पटकावल्याने त्यांचे विशेष अभिनंदन होत आहे. रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी त्यांचे विशेष कौतुक केले आहे.कोकणात प्रथम तर राज्यात अकरावा क्रमांक मिळाला आहे.

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या निसर्गाशी संबंधित पंच तत्वांवर आधारित स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेंतर्गत दोन हजार ते तीन हजार लोकसंख्या गटामध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या गावांमध्ये तुपगाव ग्रामपंचायतीचा विभागात प्रथम क्रमांक आला. प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याने पन्नास लाख रुपयांचे पारितोषिक जिंकले. माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण व जतन करण्यासाठी ग्रामपंचायत तुपगाव यांनी केलेल्या या कामगिरीबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि माझी वसुंधरा अभियान संचालनालय यांचे वतीने देण्यात आला.

सरपंच रवींद्र कुंभार व ग्राम पंचायत अधिकारी विश्वास वारे यांनी हा पुरस्कार ग्राम पंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शिक्षक वृंद, ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच, पंचायत समिती स्तरावरील गट विकास अधिकारी, सहा. गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, पाणी व स्वच्छता विभाग, सर्व ग्रामपंचायतचे क्षेत्रीय अधिकारी यांच्या मेहनतीने व सहकार्याने प्राप्त झाला असून त्यांचे आभार मानले.

## श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयात विविध उपक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय येथे शीख धर्माचे नववे गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहादत दिनानिमित्त विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शासनाच्या शिक्षण विभागाकडून सदर कार्यक्रम साजरा करून शालेय विद्यार्थ्यांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने ३५०व्या शहादत दीन प्रत्येक शाळेत विविध उपक्रम घेऊन साजरा करण्यात आला.

यावेळी शाळेत चित्रकला स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा तसेच वाचन स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत गुरु तेग बहादुर यांच्या जीवनकार्यावर आधारित सुंदर चित्रे साकारली व प्रश्नमंजुषेद्वारे आपले ज्ञान प्रदर्शित केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतिक पेडणेकर तसेच सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.



# भारत-पाकिस्तान पुन्हा भिडणार!

## महिला टी-२० विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर

**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसीने महिला टी-२० विश्वचषकाचे संपूर्ण वेळापत्रक प्रसिद्ध केले असून यामध्ये कट्टर प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याचा थरार कधी पहायला मिळणार याचा खुलासा झाला आहे. ही स्पर्धा यंदा १२ जून ते ५ जुलै या कालावधीत इंग्लंड आणि वेल्समध्ये खेळवली जाणार आहे.

या स्पर्धेत एकूण १२ संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेच्या गट १मध्ये ऑस्ट्रेलिया, भारत, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका, बांगलादेश आणि नेदरलँड्स या संघांचा समावेश आहे. त्यामुळे साखळी फेरीतच प्रेक्षकांना भारत-पाकिस्तान यांच्यातील हाय-व्होल्टेज सामना पहायला मिळणार आहे. १४ जून रोजी एजबेस्टन येथे हे दोन संघ एकमेकांशी भिडतील.



भारताने अलीकडच्या स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केली आहे, तर ऑस्ट्रेलिया सहा वेळा चॅम्पियन राहिलेला संघ आहे. पाकिस्तानमध्येही मोठ्या उलटफेर करण्याची क्षमता असल्याने या गटाला 'ग्रुप ऑफ डेथ' म्हटले जात आहे.

नेपाळमध्ये झालेल्या पात्रता फेरीनंतर बांगलादेश, आयर्लंड, नेदरलँड्स आणि स्कॉटलंड यांनी आपले स्थान निश्चित केले आहे. आता हे संघ यजमान इंग्लंड, न्यूझीलंड, श्रीलंका आणि वेस्ट इंडिजसोबत विजेतेपदासाठी झुंज देतील. साखळी फेरीत २० जून रोजी हेडिंग्ले येथे होणारा इंग्लंड आणि स्कॉटलंडमधील सामनाही विशेष आकर्षणाचे केंद्र असेल. इंग्लंडच्या भूमीवर विश्वचषक स्पर्धेत हे दोन्ही संघ पहिल्यांदाच एकमेकांविरुद्ध खेळणार आहेत. या स्पर्धेचा अंतिम सामना ५ जुलै रोजी ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडवर खेळवला जाईल.

**अशी आहे गट रचना**

गट १ : ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, भारत, पाकिस्तान, बांगलादेश, नेदरलँड्स; गट २ : वेस्ट इंडिज, इंग्लंड, न्यूझीलंड, श्रीलंका, आयर्लंड, स्कॉटलंड.

## द हंड्रेड लीगमध्ये पाक खेळाडूंवर गंडांतर?

**लंडन** : इंग्लंडमधील प्रसिद्ध द हंड्रेड लीग स्पर्धेत मँचेस्टर सुपर जायंट्स, एमआय लंडन, सदर्न ब्रेव्ह आणि सनरायझर्स लीड्स हे भारतीय संघचालक असलेले संघ आहेत आणि या संघांनी द हंड्रेडसाठी त्यांच्या संघात पाकिस्तानी खेळाडूंचा समावेश करणार नसल्याचा निर्णय घेतला आहे.

या स्पर्धेला येत्या काही दिवसात सुरुवात होणार आहे. त्याआधी खेळाडूंचा लिलाव होणार आहे. माध्यमातील वृत्तानुसार या लिलावात १८ देशातील एकूण एक हजार खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे, पण आयपीएल संघ असलेले चार फ्रँचायझी कुठल्याही पाकिस्तानी खेळाडूंवर बोली लावणार नाहीत. आतापर्यंत पुरुषांच्या द हंड्रेड लीग स्पर्धेत मोहम्मद आमिर, इमाद वसिम, शाहीन आफ्रिदी, शादाब खान आणि हरिस रौफसारखे खेळाडू या स्पर्धेत खेळताना दिसून आले आहेत, पण आता लिलावात आल्यानंतर या खेळाडूंवर कोणता संघ बोली लावणार? पाकिस्तानचे खेळाडू या लीगमध्ये सोल्ड होणार का? हे पहावे लागेल.



## रायगड संघाने मैत्री चषक जिंकला

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कुलाबा दिव्यांग सोशल फाउंडेशन आणि कुलाबा दिव्यांग क्रिकेट असोसिएशन आयोजित मैत्री चषक स्पर्धा मोहोपाडा येथील एनआयएसएम मैदानावर खेळविण्यात आली. मुंबई, रायगड, नवी मुंबई आणि ठाणे या चार संघामध्ये स्पर्धा रंगली. यामध्ये रायगड संघाने बाजी मारली.

स्पर्धेचे उद्घाटन माजी सरपंच संदीप मुंढे यांच्या हस्ते झाले. यावेळी रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा माजी अध्यक्ष गणेश वर्तक, अमित शहा, सुनील भोसले, नागेश कदम उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष तथा दिव्यांग कल्याण मंत्रालय सदस्य साईनाथ पवार आणि जिल्हाध्यक्ष शैलेश सोनकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

स्पर्धेत रायगड आणि नवी मुंबई या संघांमध्ये अंतिम सामना झाला. रायगड संघाने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्वीकारले. प्रथम फलंदाजी करताना नवी मुंबई संघाने १० षटकांत सात विकेट ५६ धावा केल्या. प्रत्युत्तरात रायगड संघाने नऊ विकेट्ने विजय प्राप्त केला. या स्पर्धेत मालिकावीर प्रसाद, ऋषिकेश पाटील उत्कृष्ट फलंदाज, कल्पेश ठाकूर उत्कृष्ट गोलंदाज आणि महेश वसावे उत्कृष्ट क्षेत्ररक्षक ठरला. विजेते संघ आणि वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.



## आपला बाजार माणगाव संघ एमएसपीएलचा मानकरी

**माणगाव : बातमीदार**

माणगाव सेल्स प्रीमियर लीग (एमएसपीएल) स्पर्धा नुकतीच धनसे ग्राउंड येथे आयोजित करण्यात आली होती. मार्केटिंगमधील मुलांनी वर्षातील एक दिवस तरी सगळे विसरून खेळाचा आनंद घ्यावा यासाठी ही स्पर्धा गेली पाच वर्ष सातत्याने घेण्यात येते. आठ संघांमध्ये आपला बाजार माणगाव संघाने अंतिम सामना जिंकून विजेतेपद पटकाविले.

या स्पर्धेसाठी माणगाव, महाड, श्रीवर्धन, नागोठणे, खेड येथील डिस्ट्रीब्यूटर तसेच व्यापारीवर्गाने मोलाचे योगदान दिले. स्पर्धेचे नियोजन एमएसपीएलचे कार्याध्यक्ष सुनील म्हशेळकर, कार्याध्यक्ष शैलेश बामणे, अध्यक्ष विजय भादावकर, निलेश शिंदे, उपाध्यक्ष सचिन लोणारकर, सचिव तुषार म्हसकर, सहसचिव ऋतिक तळेकर, खजिनदार सुरज भोनकर, सहखजिनदार अखिल बक्कम, सल्लागार सचिन आंबेतकर, यशवंत शेडगे, पप्या सकपाळ, मयुरेश कठे, नितीन होळकर यांनी केले. सर्वांच्या सहकार्याने ही स्पर्धा यशस्वी झाली.

## हार्दिक पांड्याकडून एक्स पत्नी अन् मुलाला कार गिफ्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा स्टार ऑलराउंडर हार्दिक पांड्या सध्या माहिका शर्माला डेट करत असून ती विश्वचषकादरम्यान भारतीय संघासोबतही दिसली होती. हार्दिकने आपल्या आयुष्यात पुढे वाटचाल करायला सुरुवात केली असली तरी तो त्याची एक्स पत्नी नताशा स्टॅनकोविक आणि मुलगा अगस्त्य यांची पूर्ण काळजी घेत असल्याचे दिसते. त्याने नुकतीच नताशा आणि अगस्त्यला चार कोटी रुपयांची आलिशान एसयूव्ही गिफ्ट म्हणून दिली आहे

ही कार हार्दिक पांड्यानेच भेट दिल्याची पुष्टी खुद्द कार उत्पादक कंपनीनेच केली आहे. याचा फोटो शेअर करत त्यांनी याबद्दल माहिती दिली.

## वेस्ट इंडिज-झिम्बाब्वे सामन्यात षटकारांचा विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील वेस्ट इंडिज विरुद्ध झिम्बाब्वे यांच्यातील सामन्यात धावांचा अक्षरक्ष: पाऊस पडला. कॅरेबियन बॅटर्सनी आपली मसल पॉवर दाखवून देताना उत्तुंग फटकेबाजी करत टी-२० वर्ल्डकपच्या इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च धावसंख्या उभारली. या धावसंख्येचा पाठलाग करताना झिम्बाब्वेचा संघ १०७ धावांनी कमी पडला, पण या पराभवातही त्यांनी विंडीजच्या साथीने वर्ल्डरेकॉर्ड सेट केला.

वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे यांच्यातील सामना एकतर्फी झाला, पण दोन्ही संघातील फलंदाजांनी उत्तुंग फटकेबाजीचा खास नजराणा पेश करत हा सामना खास ठरवला. टी-२० वर्ल्ड कपच्या इतिहासात



आतापर्यंत जे घडले नव्हते ते मुंबईतील वानखेडेच्या मैदानात पाहयला मिळाले. दोन्ही संघांतील बॅटर्सनी आपल्या पॉवरफुल फटकेबाजीच्या जोरावर नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे.

वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे यांच्यात मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर रंगलेल्या लढतीत टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या आतापर्यंतच्या इतिहासात एका सामन्यात सर्वाधिक षटकरांचा विक्रम नोंदवला गेला. विंडीज संघाने आपल्या डावात तब्बल १९ षटकार ठोकत नेदरलँड्सच्या विश्वविक्रमाची बरोबरी केली. २०१४च्या हंगामात नेदरलँड्सच्या संघाने टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत एका डावात १९ षटकार ठोकले होते. झिम्बाब्वेच्या संघातील बॅटर्सनी या सामन्यात १२ षटकार मारले. त्यामुळे एका सामन्यात ३१ षटकारांची आतषबाजी पहायला मिळाले.

याआधी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील एका सामन्यात एवढे षटकार कोणीही मारलेले नाहीत. २०१४च्या हंगामात आयर्लंड विरुद्ध नेदरलँड्स यांच्यातील सामन्यात ३० षटकार पहायला मिळाले होते. १२ वर्षांचा हा विक्रम वानखेडेच्या मैदानात मोडीत निघाला.

### विंडीजने उभारली दुसऱ्या क्रमांकाची विक्रमी धावसंख्या

झिम्बाब्वेच्या संघाने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतला. कॅरेबियन संघाच्या सलामीवीरांना स्वस्तात माघारी धाडण्यात झिम्बाब्वेचे गोलंदाज यशस्वी ठरले, पण त्यानंतर शिमरॉन हेटमायर आणि रॉव्हमन पॉवेल यांच्यात तुफान फटकेबाजीसह लोअर ऑर्डर बॅटर्सनी केलेल्या पॉवर हिटिंग शोच्या जोरावर वेस्ट इंडिजच्या संघाने निर्धारित २० षटकात २५४ धावा केल्या. टी-२० वर्ल्ड कपच्या इतिहासातील ही दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च धावसंख्या ठरली. या स्पर्धेत सर्वोच्च धावसंख्येचा विक्रम हा श्रीलंकेच्या नावे आहे. २००७च्या हंगामात त्यांनी केनियाविरुद्ध २६० धावा ठोकल्या होत्या.









पनवेल : गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत यांची कन्या सोनाली घरत हिचा विवाह संदेश जितेकर यांच्याशी रविवारी झाला. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे आदी मान्यवरांनी नवदाम्पत्याला आशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्या.

## विंडीजच्या दणदणीत विजयामुळे भारताची सेमी फायनलमधील वाट खडतर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजने सुपर-८मधील सामन्यात झिम्बाब्वेवर तब्बल १०७ धावांनी मात करत गटात अव्वल स्थान पटकावले आहे. या निकालामुळे भारताची सेमीफायनलची वाट आणखी खडतर झाली आहे.

वेस्ट इंडिजने प्रथम फलंदाजी करत २५४/६ अशी प्रचंड धावसंख्या उभारली. शिमरॉन हेटमायरची झंझावाती खेळी आणि रोव्हमन पॉवेलच्या वेगवान अर्धशतकामुळे कॅरेबियन संघाने धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात झिम्बाब्वे टार्गेटच्या दबावाखाली कोसळला. गोलंदाज गुडाकेश मोतीने चार विकेट घेत विजयावर शिक्कामोर्तब केले. या मोठ्या फरकाच्या विजयामुळे विंडीजचा नेट रनरेट गटात सर्वोत्तम झाला.

या निकालानंतर ग्रुप-१मध्ये वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका यांचे प्रत्येकी दोन गुण आहेत, मात्र चांगल्या रनरेटमुळे विंडीज पहिल्या क्रमांकावर आहे. दक्षिण आफ्रिका दुसऱ्या स्थानावर, तर पहिलाच सामना गमावलेल्या भारताचा नेट रनरेट निगेटिव्हमध्ये गेल्याने संघ तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला आहे. झिम्बाब्वे तळाशी आहे.

भारत आधीच दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पराभूत झाला आहे. आता उरलेले दोन्ही झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिजविरुद्धचे सामने मोठ्या फरकाने जिंकणे हीच टीम इंडियासाठी खरी कसोटी आहे, कारण केवळ विजय पुरेसा नाही; तर नेट रनरेटही सुधारावा लागणार आहे.

भारताला सेमी फायनलपर्यंत पोहचण्याचा पहिला मार्ग असा आहे की, दक्षिण आफ्रिकेने उरलेले दोन्ही सामने जिंकले, तर त्यांचे सहा गुण होतील. अशा वेळी भारताने दोन्ही सामने जिंकून चार गुण मिळवले आणि रनरेट वेस्ट इंडिजपेक्षा चांगला ठेवला, तर दुसऱ्या क्रमांकावरून सेमीफायनल गाठता येईल.

दुसरी शक्यता अशी आहे की, वेस्ट इंडिजने दक्षिण आफ्रिकेला हरवल्यास (आणि भारताने दोन्ही सामने जिंकल्यास) भारत, विंडीज आणि दक्षिण आफ्रिका तीन्ही संघांचे चार-चार गुण होतील. तेव्हा अंतिम निकाल नेट रनरेटवर ठरणार. इथेच भारतासमोर सर्वात मोठे आव्हान आहे, कारण पहिल्या सामन्यातील मोठ्या पराभवाने रनरेटला मोठा फटका बसला आहे.

### पुढील सामने जिंकावेच लागणार!

भारताचा पुढचा सामना झिम्बाब्वेविरुद्ध आहे आणि त्याच दिवशी दक्षिण आफ्रिका-वेस्ट इंडिज आमनेसामने येणार आहेत. या दोन सामन्यांचे निकालच ग्रुप-१ची दिशा जवळपास निश्चित करतील. थोडक्यात सांगायचे तर विंडीजच्या प्रचंड विजयामुळे टीम इंडियावरचा दबाव प्रचंड वाढला आहे. आता प्रत्येक सामना 'करो या मरो'चा असणार आहे.

## शिखर धवनची 'दुसरी इनिंग'

### आयर्लंडच्या सोफी शाइनसोबत विवाहबद्ध



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी स्टार क्रिकेटर 'गब्बर', अर्थात शिखर धवनने आयुष्याच्या नव्या इनिंगला सुरुवात केली आहे. धवनने शनिवारी आयर्लंडच्या सोफी शाइनसोबत एका खासगी समारंभात लग्नगाठ बांधली. हे दोघे गेल्या एक वर्षापासून रिलेशनशीपमध्ये होते.

शिखर धवन आणि सोफी शाइन यांच्या लग्नाचे विधी गेल्या काही दिवसांपासून सुरू होते. या दोघांनी स्वतः संगीत आणि हळदीच्या कार्यक्रमाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले होते. युजवेंद्र चहलने या लग्न सोहळ्याचे फोटो शेअर करताना 'मेरे यार की शादी है' असे कॅप्शन दिले आहे.

धवन आणि सोफी गेल्या वर्षी चॅम्पियन्स ट्रॉफीदरम्यान दुबईमध्ये एकत्र सामना बघताना दिसले होते. यानंतर मे महिन्यात त्यांन त्यांच्या नात्याची अधिकृत घोषणा केली होती. दोघेही सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय आहेत आणि एकमेकांसोबत वारंवार फोटो शेअर करतात. १२ जानेवारीला त्यांचा साखरपुडा पार पडला होता.

शिखर धवनने २०१२मध्ये आयशा मुखर्जीशी पहिले लग्न केले होते, मात्र २०२०पासून त्यांच्या नात्यात दुरावा निर्माण झाला आणि न्यायालयाने २०२३मध्ये त्यांचा घटस्फोट मंजूर केला. आता धवनने सोफीसोबत आयुष्याच्या दुसऱ्या इनिंगला सुरुवात केली आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com